सहल थंड प्रदेशाची
• थर्मल • स्वेटर्स • जर्किन
• ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
• कापड बाजार, नं. 9422226599
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Elite banquet
A.C. बॅन्क्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बॅन्क्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंटस्
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वतिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २६.०५.२०२५ | अंक नं. ४७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?
वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.
कोणत्याही वयातील रुग्णांसाठी वरील व्याधींवर आता खात्रीशीर निदान व उपचारासाठी नगर जिल्ह्यातील एकमेव परिपूर्ण असे
"अहमदनगर ॲलर्जी टेस्टींग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
(एम.बी.बी.एस.) ॲलर्जी-त्वचारोग, दमा व मधुमेह तज्ञ
-:नवीन पत्ता:-
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, बांबु गल्ली, धरती चौक, अ.नगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार * वेळ : स. १० ते २:३० सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार * वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत

## AHMEDNAGAR CLUB LIMITED

CIN U92413PN1947PTC005819 Dt. 09/05/1947

### APPOINTMENT OF CANTEEN CONTRACTOR

**Applications Invited for Providing Canteen Services**

Ahmednagar Club Ltd. invites applications from experienced and reliable contractors to manage and operate the Club Canteen, providing quality food and beverage services to our esteemed members.

The Club, set in a lush green ambience, features a closed restaurant, conference room, and bar facility, making it an ideal venue for members to relax, dine, and host private gatherings.

Interested parties may collect the application form from the Club Office between -

**11:00 AM and 6:00 PM from 26th May to 31th May 2025.**

The application form is available at the Reception Desk on payment of a **non-refundable fee of ₹200/-**.

For further details, please contact the Club Office during working hours.

Narendra S. Firodia
Hon. Secretary
Ahmednagar Club Ltd.

सिक्स फ्लो डायव्हर्टर चा भर उन्हाळ्यात आनंद घ्या
सर्वोत्तम शॉवर, सर्वोत्तम अनुभव!
GRAVITY
मिळण्याचे ठिकाण
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

मुलांच्या उज्वल भविष्यासाठी... प्रख्यात, प्रदिर्घ अनुभवी सर्व विषयांचे नामांकित क्लासेस् एकाच छताखाली!
सन २०२५ मध्ये १२ वी बोर्ड आणि जेईई परिक्षेत सर्व विषयांत अभूतपुर्व यश! सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!
प्रवेश प्रक्रिया सुरू
Regular | CET | JEE | NEET च्या परिपुर्ण तयारीसह
११ वी PCMB विषयांसाठी बॅचेस दि.५ जुन २०२५ पासून सुरू.
PCMB विषयांचे तज्ञ मार्गदर्शक
प्रा. विवेक चौधरी PHYSICS | प्रा. प्रमोद ढगे CHEMISTRY | प्रा. प्रभाकर गवांदे MATHS | प्रा. सुरेश जावळे BIOLOGY
सुवर्णपदक विजेते प्रा. गवांदे सरांचे ISO-9001:2015 नामांकित
गवांदे MATHS क्लासेस®
न्यू आर्टस कॉलेज गेट समोर, लेंडकर मळा, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर.
MOB. 9955 35 2323 | PH. 0241-2355513

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Estd.- 1987
महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट निकाल देणारी अग्रगण्य शाळा
* एस.एस.सी. बोर्डात ९६ टक्के विद्यार्थी विशेष व प्रथम श्रेणीत तर ४ टक्के विद्यार्थी व्दितीय श्रेणीत.
* उत्कृष्ट शैक्षणिक दर्जा.
* अद्यावत भौतिक सुविधा.
* इंग्रजी भाषा प्रयोगशाळा
* एन.सी.सी.
* निवासी मुला-मुलींसाठी आधुनिक सुसज्ज शालेय वस्तीगृह व दर्जेदार पोषक आहार.
* जलतरण व अश्वरोहन सहीत २५ देशी-विदेशी क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देणारी राज्यातील एकमेव शाळा
* ७५ लॅपटॉप, इंटरनेट व वायफायसह सुसज्ज संगणक कक्ष




आठरे पाटील पब्लिक स्कूल, अहिल्यानगर
(इंग्रजी माध्यमाची निवासी व अनिवासी मुला - मुलींची शाळा)
वडगांव गुप्ता रोड, सावेडी एरिया, अहिल्यानगर ४१४००३.
E-mail: - apschool@rediffmail.com, Website: - atharepatilpublicschool.org. Mob.- 7350119367, 9130022228.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर कचऱ्याचे ढीग

नगर - नगर शहरात स्वच्छ भारत अभियानाचा पुरता बोजवारा उडाला असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे मोठ मोठे ढीग साचलेले दिसून येत असून महापालिकेने कचरा संकलनाचा ठेका दिलेल्या संस्थेकडून ३-४ दिवस हा कचरा उचलला जात नसल्याचे दिसून येत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्या मुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या कडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.




शहरातील विविध भागात रस्त्यावर साचलेले कचऱ्याचे ढिगारे छायाचित्र दिसत आहे. (छाया - लहू दळवी, बबलू शेख)

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांच्या आरोग्यासाठी स्वच्छ भारत अभियान ही मोहीम सुरू केलेली असून या मोहिमेत शहरी भागात दैनंदिन साफसफाई आणि कचरा संकलनावर भर देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. मात्र नगर शहरात केवळ नागरिकांनाच महापालिकेकडून उपदेशाचे डोस पाजले जात आहेत. आपली यंत्रणा काय काम करते याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाहण्यास वेळ मिळत नाही काय? अशी शंका उपस्थित होत आहे.

नगर शहरात नागरिकांनी रस्त्यावर टाकलेला कचरा दोन ते तीन दिवस उचलला जात नाही, यामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढिगारे साचत आहेत. हे ढिगारे पाहून शहरातील स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. नगरकर गेल्या अनेक वर्षापासून पाणी, स्वच्छता, लाईट, रस्ते या सुविधा चांगल्या मिळण्यासाठीच अजून लढा देत आहेत असे अजून किती वर्ष चालणार आणि लोकांना कर भरून सुद्धा या समस्यांमधून सुटका कधी मिळणार की कायम या समस्या अशाच राहणार आहेत.

### महापालिकेच्या स्वच्छ भारत अभियानाचा उडाला पुरता बोजवारा

### पावसामुळे कचरा सडून पसरली दुर्गंधी

शहरात महापालिकेकडून गेल्या ३-४ दिवसांत कचरा उचलला गेला नसल्याने सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचलेले असून सध्या होत असलेल्या पावसामुळे हा कचरा सडल्याने दुर्गंधी सुटली आहे. त्याचा शहरातील नागरिकांना, व्यापाऱ्यांना नाहक त्रास सहन करण्याची वेळ आली आहे. घाणीच्या साम्राज्यामुळे डेंगू, मलेरिया, निमोनिया, यासारख्या आजारांची साथ पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे.

### महापालिकेचे स्वच्छता अभियान हे फक्त कागदोपत्रीच

महापालिकेच्या स्वच्छता अभियानाची केवळ दिखाऊ मोहीम सुरू असून प्रत्यक्षात शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले आहेत. दररोज घरासमोर येणारी घंटागाडी ८ ते १० दिवस गायब राहते, त्यामुळे नागरिकांना घरातील कचरा साठवून ठेवावा लागतो किंवा नाईलाजाने रस्त्यावर टाकावा लागतो. परिणामी शहरभर दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका महापालिकेने २ वर्षांपूर्वी दिला असला तरी प्रत्यक्षात ठरलेल्या अटींप्रमाणे काम होत नाही. शहरातील कचरा उचलला जात नसतानाही केवळ कागदोपत्री वजन दाखवले जात असल्याची चर्चा होत आहे.

### प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे

महानगरपालिकेकडून स्वच्छता मोहीमेवर लाखो रुपये खर्च केले जात आहेत. मात्र ते फक्त कागदोपत्रीच खर्च झाल्याचे दाखविले जात आहेत काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून यात महापालिका प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी लक्ष घालून संबंधित विभागाचे विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक यांची झाडाझडती घेण्यात यावी, तसेच दैनंदिन स्वच्छता व कचरा संकलनाच्या कामात सुसूत्रता आणावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### सीमा रक्षणार्थ येतोय ‘रायफल ड्रोन’

सध्या पाकिस्तान बरोबरच्या संघर्षाने वातावरण युद्धजन्य असून चीन आणि अमेरिकेलाही भारत मोठा होणे खुपत आहे.

नुकतेच यशस्वी क्षेपणास्त्र हल्ले करून आपण जगाला आपली ताकद दाखवली आहे. तरीपण न सुधारणारा पाकिस्तान विशेषतः काश्मीर सीमेवर शांतता राहू देत नसल्याने देशाच्या सीमांवर गस्त घालण्यासाठी एके-४७ रायफलने सुसज्ज अशा ड्रोन निर्मितीची तयारी सुरू आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून हा ड्रोन गस्तदरम्यान शत्रूची ओळख पटवून लक्ष्यावर अचूक गोळीबार करू शकणार आहे. याची एक खासियत अशी असेल की, कोणत्याही लक्ष्यावर प्रहार करण्यासाठी हा ड्रोन १८० अंशापर्यंत सहजतेने फिरू शकेल.

आजच्या वातावरणात कोणत्याही आव्हानांचा सामना करण्यासाठी एके-४७ सुसज्ज ड्रोन विकसित केला जाणे केवळ ‘मेक इन इंडिया’ उपक्रमाचा एक तांत्रिक नवोपक्रम नसून, ती एक फार मोठी गरज व उपलब्धी ठरेल.

रशिया-युक्रेन, चीन, तैवान, इस्त्रायल, हमास यासारख्या युद्धजन्य परिस्थितीत जगभर तणाव अन् भितीची स्थिती आहे. दहशतवादी नेहमीच निष्पाप भारतीयांची हत्या करीत आहेत. त्यांच्या कुरबुरी व पाकिस्तानी लष्कराची कटकारस्थाने थांबेलसे वाटत नाही.

यादृष्टीनेच आपल्या देशाला आत्मनिर्भरतेसह संरक्षण क्षेत्रात बलवान होण्यासाठी ठोस पावले उचलणे क्रमप्राप्त आहे. आपल्या तिन्ही दलाने पाकिस्तानच्या दहशत तळांवर अचूक हल्ला करताना जोश व होशचा परिचय करून दिला आहेच. त्याची धडकी अगदी चीन, अमेरिकेलाही बसली असेल. आता दूरदृष्टीच्या नेतृत्वात भारताची प्रतिष्ठा व भूमिका स्पष्ट करण्यासाठी विविध शिष्टमंडळे बहुसंख्य देशात पाठवली गेली आहे. देश महासत्ता होण्याच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे पाऊल आहे.

## अवकाळी पावसामुळे मे महिन्यातच सीना नदीला पूर; नगर-कल्याण रोडवरील वाहतूक काही काळ झाली ठप्प



नगर - गेल्या आठ दिवसापासून नगर शहर परिसरात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला. तर दोन दिवसापासून सुरु असलेला मुसळधार पावसामुळे मे महिन्यातच नगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीला पूर आल्याने नदी दुधडी भरुन वाहत आहे. २६ मे रोजी पहाटेच्या सुमारास सीना नदीला मोठा पूर आल्याने नगर - कल्याण रोड वरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचे हाल झाले.

शहरात होणाऱ्या संततधार पावसामुळे सीनाना नदीला पूर येऊन नदीच्या पुलावरुन पाणी वाहत असून पायी जाणारे नागरिक, दुचाकी स्वार जीव धोक्यात घालून या नदीच्या पुलावरुन प्रवास करीत आहे. गेल्या दोन वर्षापासून या नदीवर नवीन पुलाचे काम सुरु आहे परंतु अद्याप ते देखील पूर्ण न झाल्याने नागरिकांना पावसाळ्यामध्ये असा जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. महापालिका प्रशासन किंवा आपत्ती व्यवस्थापन विभागाचा कोणताही अधिकारी कर्मचारी या ठिकाणी नागरिकांना सूचना देण्यासाठी आलेला दिसला नाही असा आरोप नितीन भुतारे यांनी केला आहे.

## सीना नदीला पूर आल्याने नागरिकांची गैरसोय; त्वरित उपाययोजना कराव्यात अन्यथा आंदोलन



गजेंद्र राशीनकर

नगर - मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सीना नदीला मोठा पूर आला असून, नगर-कल्याण रोडवरील सीना नदीचा पूल पाण्याखाली गेला आहे. परिणामी या पुलावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत त्वरीत उपाय योजना करण्यात यावे, या मागणीचे निवेदन मनपा आयुक्त यांना देण्यात आले.

अहिल्यानगर महानगरपालिकेला दिलेल्या निवेदनावर शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, महिला जिल्हाध्यक्षा ॲड.अनिता दिघे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, संदीप चौधरी, किरण रोकडे आणि विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव आदिंच्या सह्या आहेत. त्यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून नवीन पुलाचे काम प्रलंबित आहे आणि ते पूर्ण झाले असते तर आज नागरिकांना हा त्रास सहन करावा लागला नसता.

निवेदनात म्हटले की, शहरातील नद्यांचे व नाल्यांचे साफसफाई काम अद्याप न झाल्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. पूरग्रस्त भागात २४ तास आपत्ती व्यवस्थापन कर्मचार्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पूर परिस्थितीत काही नागरिक पुलावरून गाड्या चालवत असल्याने मोठा अपघात होण्याची भीती आहे. पूरस्थितीत कोणतीही दुर्घटना घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची तसेच नवीन पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदारांची असेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या संदर्भात महानगरपालिकेने तातडीने ठोस पावले उचलावीत अन्यथा आंदोलनाचा इशारा मनसेच्यावतीने देण्यात आला आहे.

### संजय मिस्त्री यांचे हृदयविकाराने निधन

नगर - बोल्हेगाव फाटा येथील संजय यशवंत मिस्त्री (वय ५३, रा. सन फार्मा हॉस्पिटल जवळ, बोल्हेगाव फाटा) यांचे २५ मे रोजी दुपारी त्यांचे राहते घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांना हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्याने त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### जगन गुंजाळ यांचे हृदयविकाराने निधन



नगर - वैष्णवनगर, केडगाव येथील रहिवासी जगन बापू गुंजाळ (वय ४५) यांचे २५ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, वडील, २ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. रवींद्र गुंजाळ यांचे ते मोठे बंधू होत.

### वसंत गुंजाळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कामरगाव येथील रहिवासी वसंत दत्तात्रय गुंजाळ (वय ३८) यांचे २४ मे रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कामरगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, २ मुले असा परिवार आहे.

### नीता लोखंडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - नामदेव चौक, पाईपलाईन रोड येथील रहिवासी नीता सर्जेराव लोखंडे (वय ४९) यांचे २४ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, ४ मुली असा परिवार आहे.

### सौ.शैला मेहत्रे यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील सौ.शैला रमेश मेहत्रे (वय ५७) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात सासू, पती, दोन मुले, दिर, सून, पुतणे असा परिवार आहे.



सेवानिवृत्त सैनिक रमेश सोन्याबापू मेहेत्रे यांच्या पत्नी, बीएसएफ जवान गिरीश मेहत्रे व आशिष मेहत्रे यांच्या मातोश्री, बेलापूर येथील प्रगतशील शेतकरी अरुण, नवनाथ, आदिनाथ व नंदकिशोर मेहेत्रे यांच्या भावजई, राहुल मेहेत्रे, डॉ.कौशल मेहत्रे, डॉ.ओंकार मेहेत्रे, संकेत, प्रतिक, विजय व समर्थ मेहत्रे यांच्या चुलती होत.

### दिनानाथ यादव यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील दुग्ध व्यवसायिक दिनानाथ रामराज यादव (वय ६६) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, तीन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

दशरथ, सुनील व अनिल यादव यांचे वडील, रामबहाल, सुरेंद्र व रामकृपाल यादव यांचे बंधू होत.

# शहरात संभाव्य पूरस्थितीचा धोका लक्षात घेता नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी

### तुंबलेल्या ओढ्या, नाल्यांचे फोटो व्हायरल करत मनपा नालेसफाईच्या ढोंगबाजीची पोलखोल





नगर - मनपा प्रशासनाने शहरात नालेसफाईचे काम जलद गतीने सुरू असल्याचे म्हटले होते. याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी शहराच्या काही भागातील रस्ते, ओढे, नाल्यांची ठाकरे शिवसेनेने पाहणी केली. बहुतांशी सर्वच ठिकाणी मान्सून दाखल होण्याच्या उंबरठ्यावर असून देखील अद्यापही नाले सफाईची कामे सुरूच झालेली नसल्याचा आरोप शहरप्रमुख किरण काळे यांनी केला आहे. याबाबतची फोटो, व्हिडिओ त्यांनी समाज माध्यमांवर व्हायरल केले आहेत. मनपाच्या ढिसाळ नियोजनामुळे ऐन पावसाळ्यात शहरात संभाव्य पूरस्थितीचा धोका लक्षात घेता नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी काळे यांनी जिल्हाधिकारी तथा प्रभारी मनपा आयुक्त डॉ. पंकज आशिया यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या अवकाळी पावसाने जोर धरला आहे. पावसाच्या पाण्याचा ओढा, नाल्यांमधून निचरा होत नसल्यामुळे ठिकठिकाणी पाण्याची तळी साचली आहेत. बहुतांशी ठिकाणी नाले सफाईच्या कामांना सुरुवातच झालेली नाही. ज्या ठिकाणी नालेसफाई झाली आहे त्या ठिकाणी काढलेला गाळा हा नाल्याच्याच बांधावर टाकला जात आहे. वास्तविक पाहता तो वाहून नेणे आवश्यक होते. मात्र आता पावसामुळे तो पुन्हा त्याच नाल्यांमध्ये गेला आहे. त्यामुळे नालेसफाई करून देखील नाल्या तुंबलेल्याच आहेत. अशा निष्काळजीपणे काम करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मुख्य मोठ्या ओढ्यांमध्ये झुडपं : रासनेनगर चौक, नगर मनमाड रोडवरील हॉटेल पंचशीलच्या बाजूला असणारा ओढा, पत्रकार चौकालगतचा ओढा, सर्जेपुरा स्मशानभूमी लगतचा ओढा या ठिकाणांची पाहणी केली असता मुख्य मोठ्या ओढ्यांमध्येच मोठ्या प्रमाणावर झाडे, झुडपं, वाढलेली आढळून आली. तसेच यामध्ये प्लास्टिक, कचरा, राडा रोडा आढळून आला. यामुळे पावसाच्या पाण्याचा यातून निचरा होण्यास मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पर्यायाने थोडा जरी पाऊस झाला तरी रस्ते जलमय होत आहेत. मान्सून काळात पाऊस जोराचा झाल्यास पाण्याचा निचरा न होण्यामुळे नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरणार आहे. ओढ्या, नाल्यांच्या आवश्यक प्रमाणात पाणी न वाहून नेण्याच्या क्षमतेमुळे सीना नदीला जरी पूर आला नाही तरी देखील पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याचा धोका यामुळे निर्माण झाला आहे. अनेकांचे संसार मनपाच्या या ढिसाळ नियोजनामुळे दरवर्षी पाण्यात वाहून जातात, बुडतात. नागरिकांचे यामुळे होणारे संभाव्य नुकसान आणि हाल टाळण्यासाठी अजूनही वेळ गेलेली नाही. मनपाने युद्ध पातळीवर नालेसफाईचे काम तात्काळ पूर्ण करावे, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

### हा तर गिळंकृत ओढ्या, नाल्यांचा परिणाम

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शशिकांत चंगेडिया गेल्या अनेक वर्षांपासून गिळंकृत झालेल्या ओढ्या, नाल्यांबद्दल पोट तिडकीने मनपा प्रशासनाकडे कारवाई आणि ते खुले करण्याकरिता पाठपुरावा करीत आहेत. मात्र त्याची कोणती ही दखल मनपा घेण्यास तयार नाही. काही बिल्डर लोकांनी शहराच्या टॉपोग्राफीवरील ओढे, नालेच गिळंकृत केल्यामुळे परिणामी शहरातील नैसर्गिक सांड पाण्याचे प्रवाह नष्ट झाले आहेत. यामध्ये मोठा भ्रष्टाचार देखील झाला आहे. नगररचना विभागाच्या तत्कालीन भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांचा यामध्ये सहभाग आहे. मनपाचा प्रभारी पदभार असणाऱ्या नवनियुक्त जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर विषयात लक्ष घालून गिळंकृत ओढ्या, नाल्यांचा तथा शहराचा श्वास मोकळा करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी किरण काळे यांनी निवेदनात केली आहे.

### आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा काय करते?

पावसाळा सुरू होण्यापूर्वीच शहरभर पाणीच पाणी साचले आहे. मनपाची, जिल्हा प्रशासनाची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कुचकामी झाली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने नालेसफाई कामांची पाहणी करण्याची गरज आहे. तहान लागल्यानंतर विहीर खांदण्याला काही अर्थ नाही. त्या आधीच केलेल्या उपाययोजना पुरेशा आहेत की नाही हे पाहणे आवश्यक आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे हेल्पलाइन क्रमांक नागरिकांसाठी जाहीर करण्यात यावेत. नाले सफाई बाबतच्या तक्रारींची नोंद घेण्यासाठी प्रभाग समिती निहाय संपर्क यंत्रणा निर्माण करण्यात यावी. तेथे येणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्याची सूचना संबंधितांना देण्यात यावी, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

### कॉंक्रिटीकरणाचे रस्ते करताना पाण्याच्या निचऱ्याचे नियोजनच नाही

शहराच्या ज्या भागांमध्ये सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे रस्ते करण्यात आले आहेत त्या ठिकाणी सांडपाणी, पावसाचे पाणी याचा निचरा होण्यासाठी नियोजनच करण्यात आलेले नाही. बंदिस्त गटारांत पाणी जाण्यासाठीची कोणतीही व्यवस्था, आउटलेट नसल्यामुळे कॉंक्रिटीकरणाच्या रस्त्यांवरतीच प्रचंड प्रमाणावर पाणी साचत आहे. मोठ्या काळासाठी पाणी यावर राहिल्यामुळे या रस्त्यांचे देखील नुकसान होत आहे. त्यामुळे रस्त्यांच आयुष्य देखील कमी होणार आहे. त्यामुळे ही झालेली गंभीर चूक मनपाच्या बांधकाम विभागाने तात्काळ दुरुस्त करावी, अशी मागणी काळे यांनी केली आहे.

### अभिजीत पारधे यांचे हृदयविकाराने निधन

नगर - नीलक्रांती चौक परिसरात राहते घरात हृदयविकाराचा झटका आल्याने अभिजीत अनिल पारधे (वय ४४) यांचे २४ मे रोजी निधन झाले. त्यांना त्रास होवू लागल्याने त्यास औषधोपचाराकरीता त्यांचा भाऊ किरण अनिल पारधे यांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाल्याचे घोषीत केले आहे. या प्रकरणी सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकिय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत अभिजीत पारधे यांच्या पार्थिवावर सिद्धार्थनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, एक बहीण व दोन भाचे असा परिवार आहे.






गेल्या ३ दिवसांपासुन पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने सावेडी येथील जॉगिंग ट्रॅकला तळ्याचे स्वरूप आले तर आज सकाळी नगरकरांना सूर्यदर्शन झाले. (छाया- विजय मते)

# गृहिणी

## आरोग्य

### दातदुखीला करा बाय बाय

दातांच्या दुखण्याकडे एक सामान्य समस्या म्हणून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असते. परंतु असे न करता जर तुम्हालाही ही समस्या असेल काही घरगुती उपाय आहेत, ज्यांच्यापासून दातदुखीची समस्या कायमची दूर होण्यात मदत होईल. दात दुखण्याची अनेक कारणे असू शकतात. अनेकदा लोकांकडून दातदुखीच्या समस्येला सामान्य असल्याचे सांगत त्याकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात येत असते. यासाठी लवंगाचा वापर करावा. लवंगमध्ये अँटी-इंफ्लेमेटरी, अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे दातदुखी बरे करण्यासाठी उपयुक्त मानले जातात. दात दुखत असल्यास लवंग पाण्यात उकळून थंड करून त्या पाण्याने गुळण्या करा. याशिवाय लवंग दातांमध्ये दाबावी किंवा कापसात लवंगाचे तेल लावून दुखणाऱ्या जागेवर ठेवावे, यातून दातांना आराम मिळेल.

## पाककला

### बीटरुट पोहे

**साहित्य** : भिजवलेले पोहे, १ छोट बारिक चिरलेल बीट, १ बारिक चिरलेला कांदा, २ हिरव्या मिरच्या, १/४ चमचा जिरेमोहरी, १ चमचे तेल, कोथींबीर, २ चमचे खिसलेल खोबर,

**कृती** : नेहमीप्रमाणे पोहे स्वच्छ धुवून पाणी निथळून घ्या. गॅसवर कढईमध्ये तेल टाकून जिरेमोहरी, मिरची, कांदा छान परतुन घ्या आणि बारिक चिरलेल बीट घालून परतून घ्या. कांदा बीट छान परतून झाल की भीजवलेले पोहे घालून हलवून घ्या चवीनुसार मीठ घाला आणी ३ ते ४ मिनीटांसाठी झाकण ठेवून द्या. वरुन बारिक चिरलेली कोथिंबीर आणि खिसलेले खोबरे घाला.

## वास्तू

### दिवा कधी व कोठे लावावा?

देवी-देवतांच्या पूजेपासून हवन, पठण किंवा कोणत्याही शुभ कार्यक्रमापर्यंत दिवा लावणे शुभ मानले जाते. घरातील नकारात्मक ऊर्जाही दूर होते. दिवा लावल्याने जीवनातील संकटे संपतात. संध्याकाळी दाराजवळ दिवा लावल्याने घरात सुख-समृद्धी येते. तसेच, यामुळे नकारात्मक ऊर्जा घरापासून दूर राहते. असे मानले जाते की संध्याकाळी मुख्य प्रवेशद्वारावर दिवा लावल्याने देवी लक्ष्मी तुमच्या घरी जाण्याचा मार्ग दाखवते. वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी ५ ते ८ च्या दरम्यान घराच्या मुख्य दरवाजावर दिवा लावावा. घराच्या मुख्य दारावर दिवा अशा प्रकारे लावा की, बाहेर पडताना दिवा उजव्या बाजूला असावा. दिव्याचा प्रकाश उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा.

## सल्ला

बाथरुम साफ करताना आपण क्लिनरचा वापर करतो. त्या क्लिनरचा वापर करुन आपल्याला बादली, मग आणि टेबल साफ करता येईल. त्यासाठी बाथरुम क्लिनर बादली आणि मगवर लावा. काही वेळ तसेच राहू द्या, त्यानंतर स्क्रबरच्या मदतीने घासून स्वच्छ करा.

## सौंदर्य

रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावरील मेकअप स्वच्छ करा. चेहऱ्यावर थोडेसे बदामाचे तेल (१-२ थेंब) लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. तेल पूर्णपणे शोषून घेईपर्यंत चेहऱ्यावर तसेच राहू द्या. सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. बदामाचे तेल चेहऱ्याला नैसर्गिक चमक देण्यास मदत करते, ज्यामुळे चेहरा अधिक सुंदर दिसतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २७ मे २०२५

**करिदिन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, रोहिणी २६।५१, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. तीच तीच चूक पुन्हा कराल. मन रमणार नाही. मित्रांचा सहयोग मिळेल. मनोबल वाढेल.

**वृषभ** : पारिवारिक वाद वाढतील. खर्च होईल. अडकलेल्या कामात सुधारणा होईल. आरोग्य बिघडेल.

**मिथुन** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. साथ लाभेल. व्यक्तिगत कामात उन्नति होईल. व्यवसायात वाढ होईल.

**कर्क** : कायदेशीर कामात आत्मविश्वास कमी राहील. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल.

**सिंह** : अडकलेला पैसा मिळेल. गुंतवणूकीतून लाभ होण्याची शक्यता. आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे.

**कन्या** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. वेळेवरचे नियंत्रण सुटेल. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**वृश्चिक** : नवीन कामांना चालना मिळेल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. आरोग्य बरे राहिल.

**धनु** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. प्रतिष्ठा लाभेल.


**मकर** : आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता. कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार प्रभाव पाडतील.

**कुंभ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल. तणाव अडचणी राहतील. खर्च वाढतील.

**मीन** : वातावरण उत्साहवर्धक राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१८५ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द** : - १) वानवा; कमतरता; उणीव, कसर ३) पसरलेले; विस्तृत ६) शंभर हजार; लक्ष ७) विसावा; विश्रांती; विश्राम ८) कपाळ; भाळ १०) जंग; धातूवर वगैरे चढणारे कीट ११) पोसणारा; पालन करणारा १२) पिसारा फुलविणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी १३) आडातून पाणी शेंदून काढण्याचे एक साधन १५) छपरावर घालतात ते मातीचे पन्हळ; देवाची संमती १६) उपहास; फजिती १७) एक लोकप्रिय पेय १९) शरीरातील तीन दोषांपैकी एक; खोकला २१) भीतिप्रद; भीती वाटणारे २२) पद्धत; चाल; तऱ्हा; रिवाज २३) ओझे; पेंढी २४) जंगलाला लागलेली आग; दावानल

**उभे शब्द** :- १) मध्यस्थ; अडत्या २) प्रमाण; गमक; पुरावा; प्रमाणपत्र ३) देश सोडून पळून गेलेला ४) ज्ञान; समजूत ५) बाण सोडल्यानंतर धनुष्याच्या दोरीचा येणारा आवाज ९) मोठा; फुगीर; तडाखा; प्रहार १२) मोबदला घेऊन घरकाम करणारी स्त्री १३) कोठा; उदर १४) एक द्विदल धान्य ज्याच्यापासून डाळ बनते १७) भूल पाडणारे भूत १८) माळ; पराभव; असफलता २०) मुसलमान धर्मगुरूने काढलेला आदेश

### शब्दगंध क्र. ७१८४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | क्षि | का | ■ | प | रि | च | य |
| ■ | ति | ळ | गू | ळ | ■ | र | ज |
| ओ | ज | ■ | ज | वा | न | ■ | मा |
| मा | ■ | चा | ■ | ट | र | ■ | न |
| न | व | नी | त | ■ | सिं | ह | ■ |
| ■ | सुं | ■ | ■ | ब | ह | र | ■ |
| म | थ | ■ | सं | ■ | रा | क | ट |
| स | रा | ई | त | ■ | व | त | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अपयशाचा सूर्यास्त बऱ्याचदा पाहणाऱ्याला, यशाच्या सूर्योदयाची खरी कदर असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वस्त्रनिर्मितीसाठी हातमागाचा शोध केव्हा आणि कोणी लावला?

सुरूवातीला झाडांच्या फांट्यांपासून अतिशय साध्या प्रकारचे माग तयार केले जात असे. नंतर अनेक वर्षांपर्यंत जगभरात वस्त्रनिर्मितीसाठी साध्या हातमाग यंत्रांचा वापर केल्या जात होता. सन १७८४ मध्ये एडमंड कार्टराईट याने यंत्रमागाचा शोध लावला. भारतीय पारंपरिक वस्त्र ते अजुनही हातमागावर तयार केले जाते.

सन १७८४ मध्ये एडमंड कार्टराईटने पहिले यंत्रमाग डिझाईन केले, जेव्हा त्यांनी रिचर्ड आर्कराईट यांच्या मालकीच्या कारखान्याला भेट दिली तेव्हा त्यांना प्रेरणा मिळाली आणि विणकामाचा वेग आणि गुणवत्ता सुधारेल अशा यंत्राच्या निर्मितीसाठी काम सुरू करण्याचा विचार केला आणि मशीन तयार करण्यात यशस्वी झाले.

गवत व काठ्यांना गुंतवून बनलेल्या पक्षांच्या घरट्यांचे निरीक्षण करून मानवाला विणींचे ज्ञान कताईच्या आधींपासूनच प्राप्त झालेले होते.

यंत्रमागाचा शोध एडमंड कार्टराईट यांनी लावला होता जो ब्रिटिश शोधक होता. सन १७८४ मध्ये एडमंड कार्टराईटने पहिले यंत्रमाग डिझाईन केले, जेव्हा त्यांनी रिचर्ड आर्कराईट यांच्या मालकीच्या कारखान्याला भेट दिली तेव्हा त्यांना प्रेरणा मिळाली आणि विणकामाचा वेग आणि गुणवत्ता सुधारेल अशा यंत्राच्या निर्मितीसाठी काम सुरू करण्याचा विचार केला आणि २०१२ मध्ये ते मशीन तयार करण्यात यशस्वी झाले. १७८५ यंत्रमाग म्हणून ओळखले जाते. केनवर्थी आणि बुलो यांना हे पूर्णपणे स्वयंचलित बनवायला जवळपास ४७ वर्षे लागली आणि त्याला लँकेशायर लूम असे नाव दिले. यंत्रमागाच्या शोधामुळे सुरुवातीच्या औद्योगिक क्रांतीमध्ये लक्षणीय विकास झाला. यंत्रमागाच्या आविष्काराने कापड तयार करण्याच्या प्रक्रियेचे यांत्रिकीकरण केले आणि विणकामाच्या प्रक्रियेकडे मानवाने दुर्लक्ष करण्याची गरज कमी केली. यंत्रमागाच्या आविष्कारामुळे विणकाम प्रक्रियेला वेग आला ज्यामुळे फॅब्रिकचे उत्पादन जलद गतीने करता येते आणि कमी वेळेत अधिक फॅब्रिक तयार होते.

यंत्रमागाच्या शोधामुळे कुशल विणकरांची मागणी कमी झाली, उदाहरणार्थ १८१६ मध्ये दोन हजार विणकरांनी निषेध म्हणून यंत्रमाग गिरण्या नष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि कामगारांवर दगडफेकही केली.

एडमंड कार्टराईटने कापड तयार करण्यासाठी इंग्लंडमधील डॉनकास्टर येथे कारखाना सुरू केला. यंत्रमागाच्या शोधामुळे फॅब्रिकच्या उत्पादनाची प्रक्रिया वाढली, जरी कार्टराईट १८२३ मध्ये १९ व्या शतकात मरण पावला.

### उषा-अनिरुद्ध विवाह

उषा ही बलीचा पुत्र बाणासुर याची कन्या होय. बाणासुर महान शिवभक्त होता. त्याने शंकराकडून आपणास एक सहस्र हात असावेत, असा वर मागून घेतला. बाणासुर नंतरही नित्यनेमाने शिवपूजा करीत असे. त्यानंतर पुन्हा शंकर प्रसन्न झाले असता बाणासुर शंकराला म्हणाला, देवा, लवकरच एखादा युद्धप्रसंग येऊन त्यात माझे हे सहस्र हात तुटून पडावेत. ही विचित्र मागणी ऐकून शिवासही खेद वाटला. पण ते म्हणाले, तुझी इच्छा पुरी करणे भाग आहे. उषेच्या नवऱ्याबरोबर तुझे युद्ध होऊन तुझे सहस्र हात तुटतील. आता त्यालाही आपल्या मागण्याचा पश्चात्ताप होऊ लागला. त्यामुळे उषेला आजन्म अविवाहित ठेवावे, असे ठरवून त्याने तिला एका महालात डांबून ठेवली.

उषा ही शिवपार्वतीची निस्सीम भक्त होती. उषेचे दुःख जाणून पार्वतीने तिला सांगितले, येत्या द्वादशीला पहाटे स्वप्नात भेटणाऱ्या तरुणाबरोबर तुझा विवाह होईल. त्याप्रमाणे उषेला तिचा भावी पती स्वप्नात दिसला, पण त्याचे नावगाव, ठिकाण मात्र तिला माहिती नव्हते. तिची हुशार सखी चित्ररेखा हिने अनेक चित्रे काढून दाखवून स्वप्नात भेटलेल्या प्रियकराचा ठावठिकाणा शोधण्यासाठी उषेला मदत करण्याचे आश्वासन दिले होता होता उषेच्या स्वप्नातील तरुण म्हणजे, श्रीकृष्णाचा नातू, मदनाचा मुलगा यादववीर अनिरुद्ध असल्याचे दोघींना कळले. इकडे अनिरुद्धलाही त्याच दिवशी स्वप्नात उषेचे दर्शन होऊन तोही व्याकूळ झाला होता.

चित्ररेखा द्वारकेस जाऊन अनिरुद्धला भेटली व युक्तीप्रयुक्तीने तिने त्याला उषेच्या महालात आणून गुपचूपणे त्यांचा गांधर्व विवाह लावून दिला. काही दिवसांनी ही गोष्ट बाणासुराला कळाली. संतप्त होऊन त्याने आपले सैन्य उषेच्या महालात पाठवले. अनिरुद्धाने अतुल पराक्रम गाजवून त्यांचा समाचार घेतला. शेवटी बाणासुर स्वतःच अनिरुद्धावर चाल करून गेला. पण इकडे नारदांनी ही वार्ता द्वारकेस पोचवली होती. श्रीकृष्ण बलराम, प्रद्युम्न व सैन्यासह बाणासुराच्या नगरीस पोचले. श्रीकृष्णाच्या सुदर्शनचक्राने बाणासुराचे सहस्र हात तुटून पडले. बाणाने वर मागून घेतल्याप्रमाणे घडल्यावर त्याचा भ्रम दूर झाला व तो श्रीकृष्णाला शरण गेला. नंतर श्रीकृष्णाच्याच सांगण्यावरून तो कैलास पर्वतावर शिवाची सेवा करण्यासाठी निघून गेला. इकडे श्रीकृष्णाने शोषितापुरात म्हणजेच बाणासुराच्या नगरीत उषा व अनिरुद्ध यांचा थाटामाटाने विवाह करून दिला व सर्वांसह ते द्वारकेस निघाले.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सत्गुरु के प्रति आपके भक्ति भाव और उससे एकाकार होने के लिए आपकी बेचैनी को मैं भली भाँति समझता हूँ। कृपया शांत रहें, ताकि दयावान गुरु-शक्ति आपको अपने वैभव और तेज में घेर ले। अपने अहम् को पूर्णतया नष्ट होने दें और स्वयं को भ्रम के मंडल से निकाल लें तथा 'मैं' को पूर्ण रूप से भूल जाएँ। स्वयं का त्याग एक और महत्त्वपूर्ण कदम है, आध्यात्म के शिखर तक जाने के लिए। उसकी (सत्गुरु) मधुर याद में पूरी तरह डूब जाओ और भूत तथा भविष्य से बेखबर हो जाओ। उसकी दिव्य इच्छा के सामने आत्म समर्पण कर दो। जीवनामृत डालने के लिए बहुत ही साफ बर्तन की जरुरत है, ताकि यह अमृत प्यासी रूहों को बाँटा जा सके।

६. दूसरों के विचारों की चिंता न करो। अपनी आँखों देखी बात पर आधारित धारणाएँ सर्वोत्तम होती हैं। अपनी-अपनी ग्रहणशीलता के आधार पर हर किसी को सहायता मिलती है। सब निपुणता के रास्ते पर चल रहे हैं। हर किसी को नियमित रूप से और प्रेम, विश्वास और भक्ति के साथ भजन-अभ्यास करना है, ताकि वह दिन-ब-दिन तरक्की कर सके। गुरु-शक्ति, बाहरी और आंतरिक, दोनों रूपों में हर आवश्यक सहायता प्रदान करती है।

सत्संगों में जाना आध्यात्मिक तरक्की में बहुत सहायक होता है। इसके संयोजकों और कार्यकर्ताओं को हमेशा याद रखना चाहिये कि सत्संग सत्गुरु का है और वे अपनी सेवा और सहयोग दें, चाहे वह कितनी भी छोटी क्यों न हो, ताकि सत्संग शांति और सौहार्द के वातावरण में हो सके। एक ही पिता या प्रभु के रास्ते पर चलने वाले बच्चों के बीच प्रेम और सहयोग को देखकर मैं बहुत प्रसन्न होऊँगा। मानवता की हमेशा परीक्षा होती रही है। ८४ लाख जिया-जून में से प्रभु द्वारा दिया गया यह मानव चोला बहुत बेशकीमती है। दिन गिनती के है, एक प्रखर सत्य है। जो सत्गुरु के सुरक्षित मार्गदर्शन में आध्यत्मिक संपूर्णता के लिए मेहनत और लगन से कार्य करते हैं, वे इस धरती पर मिले सीमित समय का सर्वोत्तम उपयोग करते हैं और फलस्वरूप जिंदगी और मौत के चक्र से छूट जाते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

प्रेरणा और सहायता का स्रोत बनेगी। कोई हमारे बारे क्या सोच रहा है, बोल रहा है। हम दूसरों से जानने की कोशिश करते हैं। इसकी जरूरत नहीं है। सिर्फ उस व्यक्ति के दर्शन होने या मात्र दूर से उसके बारे सोचने से हमारे मन की जो दशा है वही उसके मन की होती है। यह इसलिये है क्योंकि ईथर रेडयो तरंगों की तरह प्रसारण करता है तथा दूर दराज जो लोग उस फ्रीक्वेनसी पर होते हैं वह भी सुनने लगते हैं और वैसा ही सोचने लगते हैं। यदि विचारों में तीव्र इच्छा का बल नहीं तो वह हल्का सा कम्पन पैदा कर खत्म हो जाते हैं। जैसे तलाब में छोटा सा कंकर डालो तो नाम मात्र लहरें बनेंगी। वे कम्पन दूसरो के मन तक नहीं पहुचेगें। अगर पहुंचते भी हैं तो बहुत धुंधले होने के कारण कुछ समझेगा नहीं। अगर आप विचार संचालन के इच्छुक हैं तो मनोबल व तीव्र इच्छा पैदा करो। तीव्र इच्छा पैदा करने के लिये मन को एक ही विचार पर टिकाये रखो और रिपीट करो। आप शांति, प्रेम व आनंद जो भी चाहते हैं उसी शब्द को सारे दिन में जब भी याद आये रिपीट करते रहो और बिंदू बाबा को अपने सामने या दिमाग में देखते रहो तो इस से आप के संकल्प द्वारा ईथर में कम्पन होगा जो बाबा के पास पहुंचेगा और बाबा से असीम बल की अनुभूति होगी। मानो हम बीमार हैं और तंदरुस्ती चाहते हैं तो सोचो मैं स्वस्थ हो रहा हूं इसे बाळाला स्तनपान सुरू ठेवावे. सहा महिन्यांच्या पुढील बाळाला वरण-भाताची पेज, भाज्यांचे सूप, त्याच्या इच्छेनुसार फळांचे ज्यूस, नारळ पाणी देत राहावे. खोकला, सुजलेला घसा आणि नाकातून पाणी गळणे हे बहतेक वेळा साध्या घरगुती उपचारानीही बरे होते. परंतु कधीकधी त्यातूनच न्यूमोनिया होऊन आजाराचे स्वरूप गंभीर होत. म्हणून वेळीच या आजाराची लक्षणे जाणून घेतली, तर डॉक्टरांकडे नेमके कधी जायचे हे सर्वांना समजेल.

दिल में बार बार अनुभव करो और भगवान के प्रति मन में भाव रखो। आप की तरंग भगवान के पास पहुचेंगी और आप ठीक हो जायेंगे। ये इसलिये होता है क्योंकि ईथर भाव तरंगों का भी सुचालक है। जिस से आप की पुकार भगवान के पास पहुंचती है और आप भगवान की शक्ति से ठीक हो जाते हैं।

विचार एक मस्तिष्क से निकल कर ईथर के माध्यम द्वारा दूसरे केन्द्र स्थान में पहुंचता है। ईथर या आकाश एक अदृश्य माध्यम है। ईथर सर्वव्यापी है, ये सम्पूर्ण अंतरिक्ष में फैला है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**जन्या** : काय रे मन्या! काय करतोस रे तू आजकाल?

**मन्या** : मी एमबीबीएस करतोय

**जन्या** : तुला जेव्हा बघतो तेव्हा तू शेतात असतोस अन् एमबीबीएस कधी करतोस रे ?

**मन्या** : एमबीबीएस म्हणजे 'म्हशी बघत बघत शेती'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* श्रीलंकेतील सर्वात मोठे शहर कोणते?

– कोलंबा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

२) वरचे गायीचे किंवा शेळीचे दूध देत असताना कमीत कमी १० मिनिटांपर्यंत उकळून द्यावे.

३) दुध उकळण्यासाठी व पिण्यासाठी वापरण्यात येणारी भांडी, बाटली स्वच्छ असा ळी उकळून घ्यावीत.

४) बालकाच्या मलमूत्राची लवकरात लवकर योग्य विल्हेवाट लावावी.

५) बालकांना हाताळण्यापूर्वी व आहार देण्यापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुऊन घ्यावे.

सरदी, खोकला, टॉन्सिल्सना सूज येणे याम ध्ये ताप येऊ शकतो. तसेच जुलाब. उलट्या यामुळे येणारा ताप, टायफॉईड, मेंदूज्वर, गोवर, कावीळ, कांजिण्या यामध्ये येणारा ताप, थंडी वाजून येणारा ताप उदा. मलेरिया, डेंग्यू, गोचीड ताप, चिकुनगुनिया अशा अनेक आजारांमध्ये ताप येतो.

लक्षणे - अंग गरम होणे, डोके दुखणे, डोळ्यांतून पाणी येणे, अंग दुखणे, अशक्तपणा जाणवणे, किरकिर करणे, अन्न कमी प्रमाणात घेणे किंवा स्तनपान न करणे.

उपचार- लिक्विड-ज्वरमेद किंवा लिक्विड-जीर्णज्वरांतक हे औषध बाळाला ५ मि.लि. दोन ते तीन वेळा द्यावे. तापासोबत सरदी-खोकला असेल, तर सायरप-टेम्पॅनिल हे औषध ५ मि.लि. तीन वेळा द्यावे. या औषधांसोबत बाळाचे अंग गार पाण्याने पुसून घ्यावे. औषधांनी बाळाची लक्षणे कमी न झाल्यास त्वरित बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व उपचार घ्यावा. अनेक वेळा डेंग्यू, मलेरिया, गोचीड ताप, चिकुनगुनिया यांसारख्या आजारांची बालकाला लागण झालेली असते. अशावेळी रक्त-लघवी तपासून डॉक्टर त्या बाबतीत निदान करू शकतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह चार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा

**डॉ. अनिल बोरगे यांची जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी**



नगर – आपण अनुसुचीत जातीचे असल्याने जाणीवपूर्वक आपल्या विरुद्ध कट कारस्थान रचून बेकायदेशीरपणे सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. अर्धवट कागदपत्रांच्या आधारे आर्थिक अपहाराच्या गुन्ह्यात गोवण्यात येवून आपल्या नोकरीवर गदा आणण्याचा प्रयत्न करत समाजात असलेली प्रतिष्ठा धुळीस मिळवणाऱ्या महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह उपायुक्त जयकुमार मुंढे, मुख्य लेखा परिक्षक विशाल पवार, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे व प्रभारी वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. सतिष राजुरकर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी निलंबित वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांनी जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.


या निवेदनात त्यांनी म्हटले की, नगर महापालिकेत आपण वैदयकिय आरोग्य अधिकारी म्हणुन ९ मार्च २०१० पासून कार्यरत आहे. मी सदर पदावर अत्यंत इमाने इतबारे संपुर्ण माझे कौशल्य वापरुन माझ्या नियुक्ती प्रमाणे पुर्ण निष्ठेने माझे कर्तव्य पार पाडीत आहे. परंतु म.न.पा आयुक्त व इतरांनी माझ्या विरोधात मनात राग ठेवून केवळ मी अनुसुचीत जातीचा आहे आणि सार्वजनीक आरोग्य विभागाच्या राज्य अधिकाऱ्यांच्या रँकींग मध्ये मी या पुर्वीच २६ व्या क्रमांका वरुन १६ व्या क्रमांकावर आलेलो आहे.याची जाणीव व कौतुक न करता मनात राग धरुन मला आयुक्त यशवंत डांगे यांनी ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या विरुध्द कोणतेही सबळ पुरावे नसतांना व तसेच आवश्यक त्या नियमा प्रमाणे कारवाई न करता मन मर्जीने मला सक्तीच्या रजेवर पाठविले आहे.

माझ्या विरुध्द वैयक्तीक द्वेषातून १६ जानेवारी रोजी एक बेकायदेशिर समिती नेमली. त्यामध्ये वर विषयात नमुद केलेल्या इसमांचा सामावेश केलेला आहे. सदरचे सर्व इसम हे आयुक्त डांगे यांच्या मर्जीतील व ते सांगतील त्या प्रमाणे काम करणारे आहेत. त्यानंतर ४ फेब्रुवारी रोजी मला आयुक्त डांगे यांनी कारणे दाखवा नोटीस दिली. त्यानंतर प्रभारी वैदयकिय अधिकारी डॉ. सतिष राजुकर यांच्यासह आयुक्त यशवंत डांगे यांनी जाणुन बुजुन पुर्वग्रहदुषीत हेतुने कोतवाली पोलीस स्टेशन येथे खोटा फौजदारी गुन्हा दाखल केला. सदर इसम एवढ्यावरच थांबले नाहीतर सदर गुन्हयाची चौकशी करुन माझे निर्दोषत्व सिध्द करण्याची संधी न देता संबंधीतांनी पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव आणुन मला बेकायदेशिररित्या अटक करुन मला अनेक विविध प्रकारे त्रास दिलेला आहे. सदर इसमांनी माझी सामाजीक प्रतिमा खराब करण्याच्या दुष्ट हेतुने तसेच माझे कौटुंबीक जीवन बिघडविण्याच्या गैरहेतुने तसेच माझे सामाजीक व नोकरीचे भवितव्य कायमचे संपविण्याच्या कुटील दुष्ट हेतुने तसेच माझे जीवीतास धोका निर्माण करणारे तसेच मला मानसिक शारीरीक आर्थिक हानी पोहचेल या वाईट हेतुने माझ्या विरुध्द खोटा, चुकीचा व बनावट गुन्हा दाखल करुन मला अनेक दिवस अटक करुन जेलमध्ये ठेवण्यास सदर इसमांनी भाग पाडले आहे.

सदर गुन्हयात पोलीस स्टेशनचे तपासी अधिकारी यांनी अत्यंत योग्य पध्दतीने सर्व तपास पूर्ण करुन त्यामधील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे त्यांच्या उच्च अधिकाऱ्यांकडे त्याबाबत संपुर्णपणे सबळ माहिती पाठविली व त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी अहिल्यानगर शहर विभाग यांनी त्यांच्याकडील जा क्र, शवी/गुन्हे/१३९३/२०२५ दिनांक २९/०३/२०२५ अन्वये पत्रान्वये माझ्या विरुध्द कोर्टात दोषारोपपत्र पाठविणे इतपत पुरावा नसल्याने मला बी एन एस एचे कलम १८९ प्रमाणे सोडून दिलेले आहे.

यावरुन वरील सर्व इसमांनी कट कारस्थान करुन केवळ मी मागासवर्गीय जातीचा असल्याने मला बदनाम करुन माझी नोकरी घालविण्याच्या दुष्ट हेतुने वर नमुद आरोपींनी वरील प्रकारे अक्षम्य असा गुन्हा केलेला आहे. त्यामुळे या सर्वांच्या विरुद्ध बी एन एस चे कलम ३१८ (४), ३३६(१), ३३६(२), ३३६(३), ३३६(४),३३५, ३३८, ३४०(२), ३५६ (१) ६१ (२) ३ (५) तसेच अनुसुचीत जाती / अनुसुचीत जमाती (अत्याचारास प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे कलम ३ (१), (आर) (एस) अन्वये गुन्हा दाखल करण्याची मांगणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कडे डॉ.अनिल बोरगे यांनी निवेदनाद्वारे केली.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, छत्रपती संभाजीनगरच्या शहर जिल्हा निरीक्षकपदी हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती



नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या छत्रपती संभाजीनगरचे शहर जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या आदेशाने व पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती करून पत्र देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या छत्रपती संभाजीनगरचे शहर जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा दांडगा जनसंपर्क असून पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरीत्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी सर्व शक्तीनिशी कटीबद्ध राहणार असल्याचे सांगितले तर सत्काराला उत्तर देत नूतन संभाजीनगर शहर जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी म्हणाले की, पक्षाने जी निरीक्षकपदी जबाबदारी टाकली आहे ती पक्षाचे ध्येय धोरण प्रमाणे कार्य करून पक्षाचे संघटन व ताकद वाढवण्यासाठी व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार सर्व दूर पोहोचवण्यासाठी कटीबद्ध राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी २८ मे रोजी होणाऱ्या आंदोलनावर युनियन ठाम

**प्रशासनाचे लेखी उत्तर मान्य नाही**



जितेंद्र सारसर

नगर – महापालिकेतील कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न गेले कित्येक वर्षापासून प्रलंबित असून वेळोवेळी निवेदन, पत्रव्यवहार आणि चर्चेनंतरही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत मनप प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देत २८ मे रोजी महापालिकेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर मनपा प्रशासनाने युनियनच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता किंवा बैठकीचे आयोजन न करता मनमानी पद्धतीने लेखी उत्तर कळवले. मात्र मनपा कर्मचारी युनियनला हे मान्य नसून महापालिकेसमोर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन करण्यावर युनियन ठाम आहे. जोपर्यंत आमचे प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत धरणे आंदोलन सुरू राहील असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिला आहे.

कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी होणाऱ्या आंदोलनाच्या नियोजनाची बैठक कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्या मध्ये झाली. यावेळी जितेंद्र सारसर व बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर, अनंत लोखंडे, राहुल साबळे, बलराज गायकवाड, दिपक मोहिते, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, ऋषिकेश भालेराव, संदिप चव्हाण, नंदकुमार नेमाणे, अमोल लहारे, अजय सौदे, विजय कोतकर, प्रफुल्ल लोंढे, बाळासाहेब व्यापारी, सागर साळुंके, प्रकाश साठे, भरत सारवान, विठ्ठल उमाप, सुर्यभान देवघडे, सखाराम पवार, अंतवन क्षेत्रे, अकिल सय्यद, राजेंद्र वाघमारे, अजित तारु, भास्कर आकुबत्तीन आदि उपस्थित होते.

कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५०६ कोर्ट कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाचा फरक २४ समान हप्त्यांमध्ये देण्याचा निर्णय झाला असून, केवळ एक हप्ता दिवाळीपूर्वी अदा करण्यात आला आहे. उर्वरित हप्ते अद्याप देण्यात आलेले नाहीत. याशिवाय, हद्दवाढीतील कामगारांचे फरकाचे तक्ते अद्याप तयार झालेले नाहीत. ६ व्या वेतन आयोगाचे दोन हप्ते कामगारांना मिळालेले नाहीत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही फरकाची रक्कम दिलेली नाही. कालबद्ध पदोन्नतीच्या फरकाची रक्कम गेल्या ८–१० वर्षांपासून थांबलेली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तात्काळ अदा करणे व ती भविष्यात दरमहा पगारासोबत देणे, निवृत्ती वेतन अंशदान योजनेतील २५० लाभार्थ्यांची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करणे, आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेळेवर जमा करणे, या मागण्या रखडलेल्या असून, एल.जी.एस.–एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना जादा वेतनवाढ देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा, तसेच निवड समिती गठित करून पात्र कर्मचाऱ्यांना बढती आणि कालबद्ध पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. आरोग्य विभागातील ठउकव छणक्च कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देणे, तसेच महासभेच्या ठरावानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी कामगार युनियनच्यावतीने आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली असून जोपर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत धरणे अंदोलन सुरू राहिल. असा इशारा युनियनचे वतीने महापालिका प्रशासनाला देण्यात आला.

## १३ वर्षाखालील फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्ह्याचा संघ रवाना



१३ वर्षाखालील फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्ह्याचा संघ रवाना झाला.

नगर – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित करण्यात आलेल्या सबज्युनिअर आंतर जिल्हा राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०२४–२५ साठी १३ वर्षा खालील अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ शिरपूर, जि. धुळे येथे रवाना झाला.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेमार्फत २१ एप्रिलपासून सुरु असलेल्या जिल्हा संघ निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरामधून या स्पर्धेसाठी १८ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. निवड समिती सदस्य म्हणून खालिद सय्यद व राजू पाटोळे यांनी काम पाहिले. संघ प्रशिक्षक म्हणून अभिषेक सोनवणे व रोहन कुकरेजा हे जबाबदारी पाहणार आहेत.

निवड झालेल्या खेळाडूंना जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, अमरजितसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रौनप फर्नांडिस, सहसचिव व्हिक्टर जोसेफ, प्रदीप जाधव, खजिनदार रिशपालसिंग परमार, राजू पाटोळे, जेव्हिअर स्वामी व इतर सर्व सभासदांनी स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

अहिल्यानगर जिल्ह्याचा संघातील खेळाडूंचा समावेश पुढीलप्रमाणे :– सम्राट राजकुमार आव्हाड (कर्णधार), मोहित रवींद्र चौधरी, तनिश संतोष पडागळे, शौर्य संजय मोरे, हर्षद संदीप सोनावणे, देवांश गणेश झरेकर, शौर्य महेश चंगेडिया, अर्हम प्रीतम गुगळे, अलोक प्रकाश कनोजिया, अथर्व अमित तोडमल, प्रथमेश प्रमोद लहाडे, स्वराज शिवाजी जाधव, आर्यन अनिल बोर्डे, प्रज्वल विजय ढोकळे, साईराज संतोष कबाडी, आयुष महेंद्र गाडळकर, राजवीर श्याम भूमकर, विराज सचिन दिघे.

# शहर भाजपच्या उपक्रमांनी अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्वाचे पैलू सर्वांपर्यंत जातील

**प्रा.नवनाथ वाव्हळ यांचे प्रतिपादन; अहिल्यादेवींच्या जीवनावरील व्याख्यानास प्रतिसाद**



भाजपा सावेडी मंडलाच्या वतीने आयोजित व्याख्यानाचे उद्‌घाटन करतना इतिहास अभ्यासक प्रा.नवनाथ वाव्हळ.

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य एव्हढे महान आहे की ३०० वर्षानंतरही त्यांचे सर्वत्र नाव घेतले जात आहे. लोककल्याणाचा वसा घेत त्यांनी आयुष्यभर निष्कलंक राहून नीतीने व न्यायाने सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळवून देत आदर्शवत कारभार केला. अशी महान व कर्तृत्ववान स्त्री आपल्या जिल्ह्यात जन्माला आली हे आपले भाग्यच आहे. अहिल्यादेवींच्या कार्याचा व विचारांचा जागर करण्यासाठी शहर भाजपने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे. या उपक्रमांनी अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्वाचे पैलू सर्वांपर्यंत जातील, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक प्रा.नवनाथ वाव्हळ यांनी करून अहिल्यादेवींच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांवर व्याख्यानातून प्रकाश टाकला.

अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सावेडी मंडलाच्या वतीने आयोजित व्याख्यानात इतिहास अभ्यासक प्रा.नवनाथ वाव्हळ बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर होते. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा.भानुदास बेरड, सरचिटणीस प्रशांत मुथा व महेश नामदे, सावेडी मंडल अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर कळे, मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

ॲड. अभय आगरकर म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या तीनशेव्या जयंती वर्षात अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर झाल्याचा आनंद भाजपच्या पदाधिकाऱ्यांना झाला आहे. अहिल्यादेवींच्या कार्यापासून सर्वांना प्रेरणा मिळावी यासाठी शहर भाजपने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

प्रा.नवनाथ वाव्हळ यांनी उत्कृष्टपणे अहिल्यादेवींचा जीवनपट भाजपच्या पदाधिकाऱ्यांसमोर ठेवला आहे.

प्रास्ताविकात सीए ज्ञानेश्वर काळे यांनी उपक्रमांची माहिती दिली. ज्योती दांडगे यांनी परिचय दिला.

यावेळी बाबासाहेब सानप, गोपाल वर्मा, ज्ञानेश्वर धिरडे, रेणुका करंदीकर, अर्चना बनकर, बाळासाहेब गायकवाड, अजित कोतकर, वैभव झोटिंग, सुजाता औटी, बाळासाहेब भुजबळ, हर्षल बोरा, विजयसिंह परदेशी, पंडित वाघमारे, कालिंदी केसकर, श्वेता झोंड, सुधीर मंगलारप, रवींद्र बारस्कर, विलास ताठे, शशिकांत कावळे, अशोकराव गायकवाड, अनिल ढवन, कैलास गर्जे, अभिषेक वाकळे, नितीन शेलार, सोमनाथ आव्हाड, पियुष तावरे, अरविंद आचार्य, सोमनाथ जाधव, करण कराळे, रोहित पठारे, विशाल कर्डिले, जालिंदर वाघ, साहिल शेख, सीए प्रसाद पुराणिक, ऋषिकेश धर्माधिकारी, सविता कोटा, सुजित खरमाळे, मुकुल गंधे, निशांत दातीर, महेश गुगळे, नरेंद्र कुलकर्णी, वंदना पंडित, ओमकार लेंडकर, राजेंद्र सातपुते, कृष्णा साठे, सुनील घोरपडे, अजय गाडे, संजय ढोणे, धनंजय तागडे, वैभव जोशी आदी उपस्थित होते.



अहिल्यानगर गौरव गीताचे लोकार्पण करताना आ.संग्राम जगताप व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे.

## अहिल्यानगर गौरव गीत सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल

**आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन**

नगर – जिल्ह्याचे नामांतर झाल्यावर वेगळा अभिमान सर्वांमध्ये जागृत झाला आहे. जिल्ह्याच्या नामांतराने गुलामगिरीचे दारिद्र्य दूर झाले आहे. जसे नाव बदलले तसा आता विकासही सुरु आहे. राज्यातील महायुती सरकार जिल्ह्याच्या विकासासाठी भरभरून देत आहे. विचार भारतीच्या उपक्रमांमधून समाजाला दिशा देण्याचे कार्य होत आहे. अहिल्यानगर गौरव गीत पाहून अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. हे गीत सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगरचा दैदिप्यमान इतिहास, जिल्ह्यातील सर्व संत मंडळी व अहिल्यादेवींचे कार्य याची सांगड असलेले 'अहिल्यानगर गौरव गीताचे' माऊली सभागृहात झालेल्या कार्यक्रमात लोकार्पण झाले. विचार भारतीच्या संकालापानेतून व गौतम मुनोत प्रोडक्शन निर्मित जयजयकार करू अहिल्यादेवीचा... जयजयकार करू अहिल्यानगरीचा... हे गौरव गीत जेव्हा एलएडी स्क्रीनवर दाखण्यात आले तेव्हा उपस्थित नगरकरांनी टाळ्यांचा कडकडाट करत उभे राहून भारतमातेचा व अहिल्यादेवींचा जयघोष करत गीताला मानवंदना दिली. या अहिल्यानगर गौरव गीताचे लोकार्पण आ.संग्राम जगताप व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे यांच्या हस्ते झाले. यावेळी विचार भारतीचे अध्यक्ष अरुणराव कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक रवींद्र मुळे, निर्माते गौतम मुनोत, गीतकार संजय धोत्रे, संगीत संयोजक डॉ.निरज करंदीकर, श्रीमती मुनोत व लेखक प्रशांत पोळ आदी उपस्थित होते.

गीताचे निर्माते गौतम मुनोत म्हणाले, अहिल्यानगर गौरव गीत १०० टक्के मेड इन नगर आहे. गीताचे गीतकार, संगीतकार, गायक व निर्माते सर्व नगरचेच आहेत. सर्वांनी या गीताच्या निर्मितीसाठी रात्रंदिवस खूप मेहनत घेतली आहे. नगरकर या गौरव गीताला स्वीकारून जास्तीत जास्त शेअर करतील. विचार भारतीने एक चांगली व प्रेरणादायी निर्मिती करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी धन्यवाद मानले.

यावेळी रवींद्र मुळे म्हणाले, नगरच्या नामांतरासाठी विचार भारतीने ध्यास घेतला होता. सुदैवाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षात हे नामांतर झाले आहे. जिल्ह्याचा दैदिप्यमान इतिहास पुढील पिढीला समजावा, अहिल्यानगरी बद्दल सर्वांना अभिमान वाटावा यासाठी खास गौरव गीताची निर्मिती केली आहे. हे गीत सर्व शाळांच्या मध्ये रोज ऐकले जावे. शासकीय कार्यक्रमात वाजावे आणि त्यातून उज्वल नव्या पिढीची निर्माण व्हावी यासाठी विचार भारती प्रयत्नशील आहे.

यावेळी संगीतकार डॉ.नीरज करंदीकर, गीतकार संजय धोत्रे आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विराज मुनोत यांनी केले. गौरव गीताची संकल्पना विचार भारती, निर्माता गौतम मुनोत, गीतकार संजय धोत्रे, गायक रोहित राऊत व अपूर्वा निषाद, संगीतकार डॉ. नीरज करंदीकर, कोरस अजित विसपुते, अमृता बेडेकर, ऋतुजा पाठक, श्रेया सुवर्णपाठकी, दीप्ती करंदीकर, चैतन्य जोग, व्हिडिओ एडिटर प्रथमेश बर्डे, निर्मिती पश्चात विराज मुनोत व प्रशांत जठार यांनी केली.

# अहिल्यादेवी होळकरांचे शासन हे विकास आणि वारसा याचे प्रतीक

**बाळासाहेब भुजबळ यांचे प्रतिपादन; पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांसाठी भाजपा ओबीसी मोर्चाची नियोजन बैठक**



भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी ओबीसी मोर्चाची नियोजन बैठक झाली.

नगर – अहिल्यादेवी होळकरांना पुण्यश्लोक, राजमाता, देवी अशा नावाने गौरविण्यात आले आहे. धर्म, जात, लिंग असा भेदभाव न करता त्यांनी न्याय, सेवा आणि कल्याण यांना सर्वोच्च स्थान दिले. भारताच्या सांस्कृतिक चेतना आणि धार्मिक वारसा पुनर्जीवनासाठी त्यांनी ऐतिहासिक योगदान दिले आहे. त्यांचे जीवन सुशासन, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, आणि राष्ट्र उभारण्याचे उदाहरण बनले आहे. अहिल्यादेवी यांचे शासन हे विकास आणि वारसा याचे प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकार त्यांच्या कार्याचे पुनरुज्जीवन करीत आहे, असे प्रतिपादन ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्या सूचनेप्रमाणे ओबीसी मोर्चाचे वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त विविध कार्यक्रम शहरात राबविण्यात येणार आहे. या त्रिशताब्दी दिनानिमित्त घाट पूजन, मंदिरे पूजन, साफसफाई स्वच्छता, चित्ररथ, शोभायात्रा, स्टीकर तयार करणे, पत्रक वाटप करणे आदी कार्यक्रम होणार आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी ओबीसी मोर्चाची नियोजन बैठक झाली. याप्रसंगी बाळासाहेब भुजबळ, सरचिटणीस सौ.वैशाली उदावंत, अनिल निकम, उपाध्यक्ष बाळासाहेब खताडे, कुंडलिक गदादे, सरचिटणीस रोहित पठारे, श्रीकांत फंड, सचिन पावले, सचिन पळशीकर, विनोद भिंगारे, दीपक देहेकर, विक्रम शिंदे, ज्ञानेश्वर धिरडे, गणेश कांनगावकर, सुरेश लोळगे, किशोर रायमोकर, चंद्रकांत मानकर, प्रभाकर तावरे, पियुष तावरे, महेंद्र जाधव, विनोद बोगा, सोमनाथ चिंतामणी आदी उपस्थित होते.

वैशाली उदावंत म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हुंडा विरोधी कडक कायदे केले, विधवांना मुले दत्तक घेण्याचे स्वातंत्र्य दिले. महिलांना शिक्षणाचा अधिकार दिला. महिला आणि मुलांसाठी विशेष संरक्षण कायदे केले. निपुत्रिक विधवांची मालमत्ता जप्त करण्याचे धोरण संपुष्टात आणले. विधवा पुनर्विवाहाला नैतिक समर्थन दिले. महिलांना युद्ध कौशल्य शिकवले.आणि महिलांची लष्करी तुकडी तयार केली, असे न्याय, सामाजिक सुधारणा आणि महिला सक्षमीकरणात महत्त्वाचे योगदान दिले आहे.

रोहित पठारे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन पळशीकर यांनी आभार मानले. या बैठकीसाठी ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ३० मे रोजी सवलतीच्या दरात ‘जनरल शस्त्रक्रिया शिबीर’

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी म.सा. हॉस्पिटीलमध्ये जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ३० मे रोजी सकाळी १० ते २ यावेळेत हे शिबिर होणार आहे. प्रदिर्घ अनुभव असलेले जनरल तज्ज्ञ डॉ. प्रविण मुनोत व डॉ. विवेक भापकर हे शिबिरार्थींची तपासणी करून सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया करणार आहेत.



अपेंडिक्स (इंटरवल)१००००, इंगवायनल हार्निया १००००, हायड्रोसिल ४००० अशा माफक दरात केल्या जातील. औषधांचा खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. तसेच महावीर भवन येथे रूग्ण आणि रूग्णांचे नातेवाईकांसाठी ३५ रूपयात भोजन सुविधा उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सुविधा उपलब्ध आहे. शिबिराच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ०२४१२३२०४७३/७४/७५ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

# भारत आज मोठ्या वेगाने विकसित, आत्मनिर्भर, शक्तिशाली होत आहे

**प्रशांत पोळ यांचे प्रतिपादन; ग. म. मुळे व्याख्यानमालेस मोठ्या उत्साहात प्रारंभ**

नगर – पूर्वीच्या काळी जगातील सर्वात समृद्ध व सर्वश्रेष्ठ असलेल्या आपल्या भारतास मुघलांनी व इंग्रजांनी लुटले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर आलेल्या राज्यकर्त्यांनी ब्रिटिशांचे राज्य एकप्रकारे पुढे चालवत भारतास लाचार केले. पण २०१४ साली भारतात झालेले परिवर्तन हे देशाला उज्वल भवितव्याकडे नेणारे ठरले. त्यामुळे भारत आज मोठ्या वेगाने विकसित, आत्मनिर्भर, शक्तिशाली होत असून यशाची शिखरे गाठत आहे. एकेकाळी लाचार देश म्हणून हिणवले जाणाऱ्या भारताकडे आता जग मोठ्या आदराने बघत आहे. हा बदलता भारत आहे, असे प्रतिपादन लेखक व विचारवंत प्रशांत पोळ यांनी केले.



ग. म. मुळे व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना लेखक व विचारवंत प्रशांत पोळ.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन माऊली सभागृहात झाले. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रशांत पोळ यांनी विकसित भारत... स्वप्नातून सत्याकडे या विषयावर गुंफले. यावेळी आमदार संग्राम जगताप, पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे, विचार भारतीचे अध्यक्ष अरुणराव कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक रवींद्र मुळे, सचिव सुधीर लांडगे, उपाध्यक्ष अनिल मोहिते, अशोक गायकवाड आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. व्याख्यानमालेचे हे १५ वे वर्ष आहे.

व्याख्यानात प्रशांत पोळ यांनी पूर्वीचा भारत व आताच्या विकसित भारताची तुलनात्मक परिस्थिती श्रोत्यांपुढे उदाहरणांसह मांडली. ते म्हणाले, पूर्वीच्या काळी जगातील सर्वात समृद्ध देश असलेला आपला भारत ज्ञानवान देश होता. अडीच हजार वर्षांपूर्वी देशात मानवी शरीराचा पूर्ण अभ्यास करून उपचार करण्याचे ज्ञान अवगत होते. जगातील पहिले धरण व पहिले खेळाचे स्टेडियम भारताने हजारो वर्षांपूर्वीच उभारले होते. अनेक धातूंची निर्मिती, गणिती ज्ञान भारताने शोधले. व्यापार करण्याची क्षमता असलेली जहाजे भारतात होती. असा आपला भारत जगात सर्वश्रेष्ठ संपन्न असा देश होता. पण इस्लामी व इंग्रजांनी भारताचे वैभव लुटून नष्ट केले. स्वातंत्र्य लढ्याने मिळालेले स्वातंत्र्यानंतर तत्कालीन राज्यकर्त्यांनी भारतास निस्तेज, शक्तीहीन व लाचार केले हे दुर्दैव. स्वातंत्र्यानंतरचे राज्यकर्ते ब्रिटिशांचे राज्य एकप्रकारे पुढे चालवत होते म्हणून भारत मागे राहिला.

भारताच्या विकासास खऱ्या अभूतपूर्व परिवर्तनास सुरुवात झाली १६ मे २०१४ या तारखेपासून. त्यावेळी दूरदृष्टी असलेले संवेदनशील सरकार केंद्रात स्थापन झाले. त्यांना देशातील जागरूक समाजाची साथ मिळाली. त्यामुळे भारत आज मोठ्या वेगाने विकसित होत आहे. आलेल्या संकटातून भारताने सुवर्णसंधी शोधून आत्मनिर्भय भारत निर्माण केला. कोरोना संकटकाळात भारताने कोणत्याही देशाची मदत न घेता स्वतःच्या हिमतीवर व ताकदीवर कोरोनावर यशस्वीपणे मात केली. भारतावर आलेली आपत्ती योग्य नियोजनामुळे इष्टापत्तीत परिवर्तित केली. आता योग्य नियोजनामुळे भारत निश्चित अर्थाने यशाची शिखरे गाठत आहे. त्यामुळे जगातील चौथी अर्थव्यवस्था असलेला भारत लवकरच तिसऱ्या स्थानावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता जग मोठ्या आदराने भारताकडे बघत आहे.

प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. विचार भारतीचे सहसचिव महेंद्र जाखेटे यांनी पाहुण्यांचा परिचय देला. अजित पंडित, ओमकार देऊळगावकर व देशपांडे यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.विक्रम दीडवाणीया यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश गोळे, सुनील नागोरी, उदय भणगे, मनोज झंवर, रवींद्र बारस्कर, विशारद पेशकर आदींनी नियोजन केले.

# भारतातील पहिले ‘दुसरे बालपण कला- आनंद उत्सव स्पर्धा २०२५’ मध्ये ऑंकार संगीत निकेतन, नगर प्रथम तर स्वानंद महिला संस्था, पुणे व्दितीय

नगर – येथील डॉ. कांकरियांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित भारतातील पहिले ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले आगळे वेगळे ‘दुसरे बालपण कला–आनंद उत्सव २०२५’ स्पर्धा रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती सभागृह येथे झाल्या. प्रथम पारितोषिक अहिल्यानगर येथील संगीत कलानिकेतन– चैत्रगौरी तर व्दितीय पुणे येथील स्वानंद महिला संघ –मंगळागौरीने पटकावले. तृतीय गीतानंद फौंडेशन– चला सख्यांनो करा, उत्तेजनार्थ एक आमचे आम्ही– येताय ना बाप्पा, उत्तेजनार्थ दोन नाटय आराधना–आली माझ्या घरी ही दिवाळी. अशी माहिती कार्याध्यक्षा डॉ.सुधा कांकरिया यांनी दिली.

दुसरे बालपण आनंद उत्सव २०२५ स्पर्धेची सुरूवात सकाळी ९ वाजता ज्येष्ठ कविवर्य चंद्रकांत पालवे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व नटराज पूजनाने झाली. सदर प्रसंगी संयोजन समितीचे मानकन्हैय्या ट्रस्टचे संचालक डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया, नंदकुमार देशपांडे, सदाशिव मोहिते, रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, गुरूमाऊलीचे चंद्रकांत पंडित, प्रशांत कटके, लेखक चंद्रशेखर जोशी, पुरूषोत्तम जाधव उपस्थित होते. नृत्य विशारद सौ.सुरेखा डावरे, अभिनय क्षेत्रातील नावाजलेले श्री देवीप्रसाद सोहोनी, संगीत क्षेत्रातील तज्ज्ञ अभिजीत आपस्तंब यांनी परिक्षण केले.




डॉ. कांकरियांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित भारतातील पहिले ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले आगळे वेगळे ‘दुसरे बालपण कला–आनंद उत्सव २०२५’ स्पर्धा उत्साहात पार पडली.


डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की दुसरे बालपण २०२५ या स्पर्धेत आठ संघ व ५६ कलाकार सहभागी झाले. यात नाटिका, नृत्यनाटिका, संगीत नाटिका यांचा समावेश होता. पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धा संपल्यानंतर लगेचच करण्यात आले.

सौ. सुरेखा डावरे म्हणाल्या की, प्रत्येक सादरीकरण सुंदर व बहारदार होते. भारतीय सण आणि उत्सव हा विषय असल्यामुळे नवरात्र, गणपती उत्सव, मंगळागौर, प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सणांची ओळख, विठोबाची वारी, दिवाळी वगैरे सणांची उत्साहवर्धक सादरीकरण मनाला भावुन गेले.

सोहनी म्हणाले कि सादरीकरणामधील सच्चेपणा, सांघिक एकता तसेच अभिनय, संगीत, नृत्याची जोड, विषयाची निवड, लेखनामधील मार्मिक संवाद, प्रेक्षकांचा प्रतिसाद आणि वेषभुषा/रंगभुषा, वेळेचे भान सर्वांचा एकत्रित विचार करून परिक्षण करण्यात आले आहे. चैत्रगौरी, मंगळागौरी, या सख्यांनो करा घाई, येताय ना बाप्पा, आली माझ्या घरी ही दिवाळी सहित सर्व सादरीकरणांनी सभागृहातील प्रेक्षकांना खिळवुन ठेवले. दिवसभर प्रेक्षकांनी उत्साहाने प्रतिसाद दिला.

स्पर्धकांच्यावतीने संगीता देऊळगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, देशातील ही पहिली अत्यंत मार्मिक अशी स्पर्धा आहे. त्यामुळे आम्हाला परत आमचे दुसरे बालपण पुन्हा जगता आले. मानकन्हैय्या ट्रस्टने सुंदर असे संयोजन केले. सुरूवातीस डॉ.सुधा कांकरिया यांनी प्रास्ताविक, डॉ. प्रकाश कांकरिया यांनी स्वागत, सुत्रसंचालन नंदकुमार देशपांडे व प्रशांत कटके तर आभार चंद्रकांत पंडित व प्रसाद बेडेकर यांनी मानले. स्पर्धा ही युट्युबवर पहाता येणार आहे.

# शहर स्थापना दिनानिमित्त अलकरम हॉस्पिटलतर्फे विविध तपासण्या शिबीर




नगर – अलकरम एज्युकेशनल अँड सोशल सोसायटी व पटेल स्पेशालिटी क्लिनिकच्या संयुक्त विद्यमाने अलकरम हॉस्पिटलच्यावतीने अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त विविध रक्त व लघवी तपासण्या, सोनोग्राफी, एक्स–रे, प्रसुती तसेच मोफत थायरॉईड आणि यूरिक सिड तपासणी आदी मध्ये रुग्णांना सवलतीत उपचार शिबीराचे २७ मे रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत आयोजित केले आहे, अशी माहिती डॉ.अशपाक पटेल यांनी दिली.

यामध्ये रक्त व लघवी तपासणी मध्ये ३० ते ५० टक्के सूट, एक्स–रे २०० रुपयात, सोनोग्राफी सर्व तपासण्यावर वीस ते तीस टक्के सूट, फोटोथेरपी मध्ये ३० ते ४० टक्के सूट देण्यात येईल असे डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले.

शिबिराचा गरजू रुग्णांनी फायदा घ्यावा व अधिक माहितीसाठी तौफिक तांबोली यांच्याशी ९८६०७०८०१६ – ०२४१–२४२३३३३ या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन शेरअली शेख यांनी केले आहे.

# विश्वभारती अ‍ॅकॅडमीज् ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये एम.बी.ए. अभ्यासक्रमास मंजुरी

नगर – मागील १८ वर्षांपासून तांत्रिक आणि औषधनिर्माण शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अहिल्यानगर येथील ‘विश्वभारती अ‍ॅकॅडमीज् ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स’च्या शिरपेचात मनाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांनी विश्वभारती अ‍ॅकॅडमीज कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट या संस्थेला एम.बी.ए. (Master of Business Administration) अभ्यासक्रमासाठी मंजुरी दिली आहे.

या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता १२० इतकी निश्चित करण्यात आली असून, हा कोर्स सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणार आहे. ही मान्यता मिळाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता एम.बी.ए.सारखा दर्जेदार व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक अभ्यासक्रम शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. विशेष म्हणजे, व्यवस्थापन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी विविध क्षेत्रांतील नेतृत्वक्षम व उद्योगाभिमुख व्यावसायिक म्हणून घडू शकतील. या नवीन एमबीए अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मार्केटिंग, फायनान्स, मानव संसाधन, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध विषयांचे सखोल ज्ञान मिळेल. तसेच, प्रॅक्टिकल अनुभवासाठी इंटर्नशिप व उद्योगांशी संपर्क यावर विशेष भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये, नेतृत्वगुण, तांत्रिक समज तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर शिकविण्यासाठी आधुनिक सुविधांयुक्त संगणक प्रयोगशाळा, अनुभवी व तज्ञ अध्यापकवर्ग, तसेच प्रशिक्षित ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाद्वारे मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून दिल्या जातील. या संधींमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला जाईल. यामुळे, शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी स्पर्धात्मक नोकऱ्यांसाठी सज्ज व यशस्वी होऊ शकतील.

विश्वभारती अ‍ॅकॅडमीज् ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स ही अहिल्यानगर जिल्ह्यातील एक नावाजलेली शिक्षण संस्था असून पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, फार्मसी, कॉम्प्युटर सायन्स आणि मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांनी आपले उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण केले आहे. सुसज्ज इमारत, आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी अध्यापकवर्ग, लायब्ररी, बस व कॅन्टीन सुविधा यांमुळे येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संपूर्ण सुविधा मिळत असून त्यांचा सर्वांगीण विकास होतो. विश्वभारती अ‍ॅकॅडमीने गेल्या काही वर्षांत तांत्रिक, फार्मसी व व्यवसायिक शिक्षणात महत्त्वपूर्ण प्रगती केली असून, आता शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरु झाल्याने संस्थेची शैक्षणिक व्याप्ती आणि गुणवत्ता अधिक बळकट होईल, असा विश्वास संस्थेच्या प्रशासनाने व्यक्त केला आहे.

विश्वभारती अ‍ॅकॅडमीज कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट मध्ये एम.बी.ए. या कोर्सबाबत अधिक जाणून घेण्यासाठी तसेच प्रवेश संदर्भात अधिक माहितीसाठी ७०३०९००७०९ यावर संपर्क साधावा, असे आवाहन या निमित्ताने संस्थेतर्फे करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **तुकाराम बाबुराव तांबे** रा. भिडे हॉस्पिटलजवळ, सावेडी अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई,दावा,लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१० दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकत वर्णन :** डि अहिल्यानगर/अहमदनगर सब डि ता. नगर पैकी अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे नागरदेवळे** येथील **सर्व्हे नंबर १०३ / १०४** मे. दु. निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील खुल्या प्लॉटस् मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| प्लॉट नं. | क्षेत्रफळचौ.मीटर | यांसी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ७२ | २००.०० | १२. मी रोड | ९.मी.रोड | प्लॉट नं.५८ व ५९ | प्लॉट नं. ७३ |
| ७३ | १६०.०० | १२. मी रोड | प्लॉट नं.७२ | प्लॉट नं.५६,५७ व ५५ | प्लॉट नं. ७४ |
| वरील दोन्ही संपुर्ण प्लॉटस् मिळकतीबाबत. | | | | | |

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २६/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८


# अहिल्यानगर शहरामध्ये अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करा अन्यथा ३० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

नगर – नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करुन महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल करून मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.



सदर प्रकरणात त्वरीत कारवाई न झाल्यास ३० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघटनेच्या वतीने उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी दिला आहे. नगर शहरातील अहिल्यानगर महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. हे होर्डिंग विद्युत तारांच्या अगदी जवळ उभे असल्याने विजेचा शॉक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वी अशाच प्रकारच्या एका होर्डिंगमुळे विजेचा धक्का लागून एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे असे प्रकार पुन्हा घडल्यास महापालिका आणि जाहिरात एजन्सींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संघटनेने केलेल्या आरोपानुसार, जाहिरात एजन्सींनी कामगार सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना राबवलेली नाही. त्यांच्याकडे खरे परवाने नसून बोगस कागदपत्रांवरच कामगार कार्यालयाकडून परवाने मिळवण्यात आले आहेत. या सर्व प्रकारात महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय हे शक्य नाही, असा ठपका ठेवत संघटनेने त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली आहे.

पावसाळ्यात धोकादायक होर्डिंग नागरिकांच्या जीवावर उठले आहे. एखादी मोठी दुर्घटना होण्यापूर्वी अशा होर्डिंगवर व त्या जाहिरात एजन्सीवर कारवाई करणे अपेक्षित आहे. शहरात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत होर्डिंग यांना पेव फुटले असून, जाहिरात एजन्सी व मनपातील संबंधित अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा रावसाहेब काळे पाटील यांनी व्यक्त केली.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **शेख अब्दुल हमीद चांदमिया, रा. नागरदेवळे, ता. जि. अ. नगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांना सदर मिळकत विक्री करण्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. त्यांनी आमचे अशिलांबरोबर साठेखत करुन कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन तसेच व्यवहारापोटी विसार म्हणुन आमचे आशिला कडुन रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा मनाई, दावा, लिज,गहाण,दान, बक्षिस, पोटगी हक्क, जनरल मुखत्यारपत्र, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारचे तक्रार अगर हरकत चालणार नाही असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे नागरदेवळे** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| | आर.चौ.मी. | रु. पै |
| ८९/१/पै | ७८.००.०० | ७८०.०० |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची १२६.३४ चौ. मीटर चे १३६०.०० चौ. फुट असून याचा नियोजित प्लॉट नंबर ४ असा आहे.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – सर्व्हे नंबर पैकी    दक्षिणेस – नियोजित प्लाट नं. ५
पश्चिमेस – रस्ता    उत्तरेस – नियोजित प्लॉट नं. ३ व विहिरीचे क्षेत्र

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २६/०५/२०२५.
अहमदनगर.

**ॲड. सचिन आसाराम भोजने**
एल.आय.सी. कॉलनी, पाऊलबुद्धे शाळेजवळ, सावेडी,
अहमदनगर मो. नं. ९८८१३९८८४१,९४०५०३५८२९


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमेश सुखदेव मोरे, रा. शेंडी, ता.व जि. अहिल्यानगर यांचे मालकी व वहिवाटीची आहे, त्यांनी सदरील मिळकत आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पुर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचेही कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासुन ७ दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यांनीशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी. व या व्यवहारांस लेखी हरकत घ्यावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**- परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन :-**
मौजे पोखर्डी, ता. व जि. अहिल्यानगर येथील अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील खालील तपशीलाची मिळकत :-

| गट नं./स.नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| २७३ | १ हे. ७० आर | ३ रू.३१ पै. |

यापैकी विद्यमान मालकीच्या खाते नं.४६३३ चे क्षेत्रातुन ० हे.०२ आर जमीन आमचे अशिलांस खरेदी देणेचे ठरले आहे.

यांसी चतुः सिमा :-
पुर्वेस :- स.नं. मधील लागु प्लॉट.    दक्षिणेस :- रस्ता.
पश्चिमेस :- रस्ता.    उत्तरेस :- स.नं. मधील लागु प्लॉट.

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वकची मिळकत. जाहीर नोटीस दिली.

ता.२६.०५.२०२५.

**ॲड. निहाल अहमद बाबुलाल बागवान**
श्रेयस लॉनच्या मागे, सैनिक कॉर्नर,
तपोवन रोड, भिस्तबाग, अहमदनगर
मो.नं. ९९२१३५५७७८.

**ॲड. विजय प्रल्हाद अत्रे,**
‘पूर्णश्री’, प्लॉट नं. २८, स्वामी गजानन
नगर, कजबे मळा, भिस्तबाग, अहमदनगर.
मो.नं. ९८२२०४३९६७.


# मंगलदीप मल्टीस्टेट संस्थेस दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी २ महिन्यांची कैद व ५ लाख ५० हजार रुपये दंडाचा आदेश

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. १९ डी. डी. कर्वे यांनी आरोपी कांता रविंद्र निकाळजे यांना २ महिन्यांचा साधा कारावास व रक्कम रु. पाच लाख पन्नास हजार रुपये दंड देण्याचा आदेश केला आहे. आरोपी कांता रविंद्र निकाळजे यांनी फिर्यादी सोसायटी मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को.ऑप. क्रे.सोसायटी ली. एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर यांचे कडून कर्ज घेतले होते, त्याचे परताव्या पोटी त्यांनी सोसायटीस धनादेश दिलेला होता. सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी सोसायटीने त्यांचे विरुद्ध न्यायालात प्रकरण दाखल केले होते, त्या प्रकरणामध्ये कोर्टाने आलेल्या पुराव्याचा विचार करून आरोपींना दोन महिन्याचा साधा कारावास व रक्कम रू. पाच लाख पन्नास हजार रुपये व दंड रक्कम न भरल्यास पंधरा दिवसांचा साधा कारावास अशी शिक्षा देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी सोसायटीचे वतीने ॲड. अमित विजय राशिनकर यांनी काम पहिले व त्यांना ॲड. मिलिंद घोरपडे यांनी सहकार्य केले. तसेच फिर्यादी सोसायटीचे वतीने माहीतगार इसम म्हणून सागर फूलारी यांनी साक्ष दिली.

# अहिल्यानगरमध्ये स्पर्धा परिक्षार्थींसाठी मोफत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

नगर – महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने यूपीएससी, एमपीएससी स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘स्पर्धा परीक्षांचा ’राज’मार्ग’ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रम ंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्याचा पहिल्या व शेवटच्या रविवारी नामांकित आजी–माजी आय. पी.एस, आय. ए. एस. अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील उच्चपदस्थ तज्ज्ञ व्यक्तींचे मोफत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती मनविसेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी दिली.

स्पर्धा परीक्षांचा ’राज’मार्ग उपक्रमाची अधिक माहिती देताना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड म्हणाले, नगरमध्ये सुमित वर्मा यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी हा मार्गदर्शक उपक्रम राबवला जात आहे. या मोफत मार्गदर्शन शिबिरासाठी इच्छुकांनी ३० मे पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीचे अर्ज मनविसे जिल्हा संपर्क कार्यालय, सिद्धीबाग समोर, जाधव हाईट्स, दुसरा मजला, अहिल्यानगर या ठिकाणी दुपारी १२ ते सायं. ६ वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी मो.९८६०५२१०२२ येथे संपर्क साधावा.

या योजनेच्या यशस्वीतेसाठी सुमित वर्मा, युवती जिल्हाध्यक्ष श्रद्धा खोंडे, शहराध्यक्ष अनिकेत शियाळ, प्रविण गायकवाड, अमोल भालसिंग, अभिषेक कलमदाणे, प्रमोद ठाकुर, प्रमोद जाधव, राहुल वर्मा, ओंकार काळे, आयुश नागरे आदी प्रयत्नशील आहेत.




*शेअर बाजारात गुंतवणूक करणं आता खूप सोपं झालं आहे. अनेक ब्रोकरेज अ‍ॅप्समुळे घरबसल्या खरेदी-विक्री करता येते. पण, काहीवेळा गुंतवणूकदारांना आपलं ब्रोकरेज अकाउंट बंद करण्याची गरज भासते. कदाचित तुम्ही दुसऱ्या ब्रोकरकडे जात असाल, किंवा शेअर बाजारातून काही काळासाठी ब्रेक घेत असाल, किंवा अगदी ब्रोकरेज शुल्कामुळे त्रस्त असाल. पण, कोणतंही ब्रोकरेज अ‍ॅप किंवा डिमॅट अकाउंट बंद करणं तितकं सोपं नसतं, जितकं ते उघडणं. जर तुम्ही योग्य प्रक्रिया पाळली नाही, तर भविष्यात तुम्हाला अडचणी येऊ शकतात. चला, शेअर मार्केट ब्रोकरेज अ‍ॅप किंवा डिमॅट अकाउंट कसं बंद करायचं, ते सोप्या भाषेत समजून घेऊया.*

# डिमॅट अकाउंट बंद करताना...




**ब्रोकरेज अ‍ॅप बंद करण्यापूर्वी लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी**

**सर्व पोझिशन्स क्लिअर करा:** तुमच्या डिमॅट खात्यात कोणताही शेअर किंवा इतर सिक्युरिटीज शिल्लक नसाव्यात. जर असतील, तर त्या विकून टाका किंवा दुसऱ्या डिमॅट खात्यात (दुसऱ्या ब्रोकरकडे) ट्रान्सफर करा.

**पैसे काढून घ्या:** तुमच्या ट्रेडिंग खात्यात जमा असलेले सर्व पैसे तुमच्या बँक खात्यात काढून घ्या.

कोणतेही शुल्क बाकी नाही: तुमच्या ब्रोकरला देय असलेले कोणतेही शुल्क, ब्रोकरेज किंवा दंड बाकी नाही याची खात्री करा. असल्यास, ते त्वरित भरा.

**कॉन्ट्रॅक्ट नोट आणि स्टेटमेंट:** मागील सर्व कॉन्ट्रॅक्ट नोट आणि अकाउंट स्टेटमेंट तुमच्याकडे सुरक्षित ठेवा. भविष्यात त्यांची गरज भासू शकते.

**ब्रोकरेज अ‍ॅप/डिमॅट अकाउंट बंद करण्याची प्रक्रिया**


अकाउंट क्लोजर फॉर्म मिळवा: बहुतेक ब्रोकरेज कंपन्या त्यांच्या वेबसाइटवर किंवा अ‍ॅपमध्ये 'अकाउंट क्लोजर फॉर्म' देतात. तो डाउनलोड करा. जर ऑनलाइन उपलब्ध नसेल, तर त्यांच्या कस्टमर केअरशी संपर्क साधा.

**फॉर्म भरा आणि सह्या करा:** फॉर्ममध्ये विचारलेली सर्व माहिती योग्यरित्या भरा. यात तुमचा डिमॅट अकाउंट नंबर, पॅन नंबर आणि बंद करण्याचे कारण सांगावे लागेल. फॉर्मवर तुमच्या स्वाक्षऱ्या करा. (जर संयुक्त खाते असेल, तर सर्व खातेदारांच्या सह्या आवश्यक आहेत.)

आवश्यक कागदपत्रे जोडा: काही ब्रोकर तुमच्या पॅन कार्डची प्रत किंवा पत्त्याच्या पुराव्याची मागणी करू शकतात. फॉर्मसोबत ती जोडा. ◆◆◆

● **फॉर्म सबमिट करा:** भरलेला फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे तुमच्या ब्रोकरच्या कार्यालयात पोस्टाने पाठवा किंवा प्रत्यक्ष जमा करा. काही ब्रोकर आता ऑनलाइन किंवा अ‍ॅपद्वारेही फॉर्म सबमिट करण्याची सुविधा देतात, पण बहुतेकांना प्रत्यक्ष फॉर्म पाठवणे आवश्यक असते.

● **प्रक्रिया पूर्ण होण्याची वाट पहा:** फॉर्म सबमिट केल्यानंतर, ब्रोकर तुमच्या अर्जाची पडताळणी करेल. सर्व काही ठीक असल्यास, काही दिवसांत तुमचे खाते बंद केले जाईल. तुम्हाला ईमेल किंवा एसएमएसद्वारे याची पुष्टी मिळेल. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी साधारणपणे ७ ते १५ कामाचे दिवस लागू शकतात.



**जागतिक अथवा प्रादेशिक युद्धजन्य परिस्थिती ही फक्त सैनिकांच्या सीमेपुरती मर्यादित राहत नाही, तर ती अर्थव्यवस्था, वित्तीय बाजारपेठा आणि सामान्य गुंतवणूकदारांवरही खोल परिणाम करते. युद्धाच्या छायेत गुंतवणूकदारांनी अधिक जागरूक, माहितीपूर्ण आणि दूरदृष्टी असलेली भूमिका घ्यावी लागते.**



# युद्धजन्य परिस्थितीत गुंतवणूकदारांनी काय करावे?

■ **नीलेश पुजारी**, करसल्लागार

युद्धजन्य काळात शेअर बाजार, कमोडिटी बाजार आणि चलन बाजार यामध्ये प्रचंड चढ-उतार दिसून येतात. उदाहरणार्थ, युद्धग्रस्त देशातील शेअर बाजार कोसळतो, तर संरक्षण उद्योगातील किंवा नैसर्गिक संसाधनाशी संबंधित कंपन्यांचे शेअर्स वाढू शकतात. अशा वेळी, गुंतवणूकदारांनी घाईघाईने निर्णय घेण्याऐवजी परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करणे गरजेचे ठरते.

गुंतवणूकशास्त्रात युद्धाला 'हाय रिस्क कंडिशन' म्हणतात. अशा काळात गुंतवणुकीतील धोका कमी करण्यासाठी काय करायला हवे? सर्वांत पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व गुंतवणूक एकाच क्षेत्रात न करता विविध क्षेत्रांत विभागावी.

इक्विटी, म्युच्युअल फंडस्, सोनं, चांदी, सरकारी बाँड्स, रिअल इस्टेट, स्विस फ्रँक यांसारख्या सुरक्षित मालमत्तांमध्ये गुंतवणूक विभागल्यास युद्धकाळातील चढउतारांची एकत्रित झळ बसणार नाही. कारण यातील प्रत्येकावर होणारे परिणाम हे विषम स्वरुपाचे असतात. युद्धामुळे महागाई वाढते, व्याजदर बदलतात, पुरवठा साखळी विस्कळीत होते. या सर्वांचा परिणाम कंपन्यांच्या नफ्यावर, अर्थव्यवस्थेच्या वृद्धीदरावर होतो. अशा वेळी 'मॅक्रो इकॉनॉमिक ट्रेंड्स'चा अभ्यास करून, कोणती मालमत्ता धोक्याच्या बाहेर आहे हे ठरवावे. युद्धाच्या बातम्यांमुळे भीतीचे वातावरण निर्माण होते. पण गुंतवणूक ही भावनांवर नव्हे तर विश्लेषणावर आधारित असावी. बाजार पडत असताना घाबरून विक्री करणे किंवा तेजीच्या आशेवर अति गुंतवणूक करणे टाळणे, हे यशस्वी ट्रेडर्सचे आणि गुंतवणूकदाराचे पहिले लक्षण आहे.

युद्ध ही तात्पुरती परिस्थिती असते. त्यामुळे बहुतेकदा दीर्घकालीन गुंतवणुकीवर तिचा मर्यादित परिणाम होतो. त्यामुळे चांगल्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये दीर्घकालीन गुंतवणूक चालू ठेवणे उपयुक्त ठरते. विशेषतः जर त्या कंपन्या युद्धोत्तर पुनर्रचनेत सहभागी होण्याची शक्यता असेल तर त्यांचा विचार जरुर करावा.

युद्धजन्य स्थितीत काही गुंतवणूकदार अशा कंपन्यांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतात ज्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे युद्धाभिमुख उद्योगांशी संबंधित असतात. अशा वेळी ईएसजी म्हणजेच एन्व्हार्नमेंटल, सोशल, गर्व्हनन्स गुंतवणुकीचे महत्त्व वाढते. संभाव्य शांतता चर्चा, युद्धाचे क्षेत्र, सामील राष्ट्रांची आर्थिक क्षमता यांचा अभ्यास करून पुढील आर्थिक घडामोडींचा अंदाज घ्यावा. तसेच पोर्टफोलिओ पुन्हा संतुलित करावा.

आकस्मिक गरजांसाठी रोख राखीव जवळ ठेवावी. एकूणच, युद्धजन्य परिस्थितीत माहितीपूर्ण निर्णय, धोका व्यवस्थापन आणि दीर्घकालीन दृष्टीकोन यांच्या साहाय्याने गुंतवणूकदार अशा संकटकाळातही सुरक्षितपणे मार्ग काढू शकतात. बाजारपेठेतील गोंधळात संयम राखणे आणि पुरेशा माहितीवर आधारित कृती करणे हेच खरे कौशल्य आहे. ◆◆◆

# गंगाजळी घटली!

रिझर्व बँकेने जारी केलेल्या माहितीनुसार १६ मे रोजी संपलेल्या आठवड्यामध्ये भारताकडील परकीय चलन साठ्याचे मूल्य ४.८ अब्ज डॉलरने कमी होऊन ६८५.७ अब्ज डॉलर या पातळीवर गेले. या आठवड्यामध्ये रुपयाच्या मूल्यात बरीच घसरण झाली. त्याचबरोबर रोखे आणि शेअर बाजारातील परकीय गुंतवणूक कमी झाल्यामुळे भारताकडील परकीय चलन साठ्यात घट झाली असल्याचे दिसून आले.



त्या अगोदरच्या भारताकडील परकीय चलन साठा ४.५ अब्ज डॉलरने वाढून ६९० अब्ज डॉलर या पातळीवर गेला होता. भारताकडे सध्या असलेला परकीय चलन साठा समाधानकारक पातळीवर आहे. या चलनातून भारताला जवळजवळ दीड वर्षाची आयात करता येऊ शकणार आहे. दरम्यान संबंधित आठवड्यामध्ये जागतिक बाजारात सोन्याचा दर कमी झाला. यामुळे रिझर्व बँकेकडे असलेल्या सोन्याचे मूल्य आठवड्यात ५.१ अब्ज डॉलरने कमी होऊन ८१.२१ अब्ज डॉलर या पातळीवर गेले.भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे ठेवलेल्या ठेवीचे मूल्य या आठवड्यात ४ दशलक्ष डॉलरने कमी होऊन ४.३ अब्ज डॉलर या पातळीवर गेले. भारताकडील परकीय चलन साठ्यांची परिस्थिती कमालीची मजबूत असली तरी भारत परकीय चलन संवर्धनासाठी प्रयत्न करत आहे. अनेक देशाबरोबर मुक्त व्यापार करार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



# म्युच्युअल फंडांमधील ओघ वाढतोय...

सरलेल्या वर्षात देशातील आणि परदेशातील आर्थिक परिस्थिती बरीच अनिश्चित होती. मात्र या कालावधीत भारतातील गुंतवणूकदारांचा म्युच्युअल फंडावरील विश्वास वाढला असल्याचे दिसून येते.

मार्च २०२५ अखेर संपलेल्या वर्षात म्युच्युअल फंडांच्या नियंत्रणाखालील असलेली मालमत्ता वार्षिक पातळीवर २२.५ टक्क्यांनी वाढवून ७० लाख कोटी रुपयांवर गेली आहे.

ही आकडेवारी ईक्रा या संस्थेने संकलित केली आहे. या संस्थेने म्हटले आहे की, एप्रिल २०२५ मधील आकडेवारीनुसार म्युच्युअल फंडांच्या ओपन इंडेड योजना मधील गुंतवणूक २३.८० टक्क्यांनी वाढली आहे. इक्विटी संदर्भातील ओपन इंडेड स्कीम मध्येही गुंतवणूक वाढत असल्याचे सांगण्यात आले.

एप्रिल २०२५ च्या माहितीनुसार म्युच्युअल फंडांच्या खात्यामध्ये ३०.२१% वाढ झाली आहे. कर्ज रोख्यासंदर्भातील खात्यापेक्षा इक्विटी संदर्भातील खात्यांची संख्या जास्त असल्याचे नमूद करण्यात आले. सध्याच्या अस्थिर परिस्थितीच्या काळातही एप्रिल महिन्यामध्ये इक्विटी संदर्भातील म्युच्युअल फंडात २४,२६९ कोटी रुपयाची गुंतवणूक झाली. यावरून गुंतवणूकदारांचा म्युच्युअल फंडावर विश्वास कायम असल्याचे दिसून येते असे या संस्थेने म्हटले आहे.

सरलेल्या वर्षांमध्ये एसआयपी म्हणजे सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅनच्या माध्यमातून गुंतवणूक करणार्‍या खात्यांची संख्या पाच टक्क्यांनी वाढून ९१४ लाख इतकी झाली आहे. आर्थिक परिस्थिती अस्थिर असल्यामुळे शेअर बाजाराचे निर्देशांक अस्थिर राहिले. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी स्वतः गुंतवणूक करण्याऐवजी म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिसून येते.

# मृत व्यक्तीचे पॅनकार्ड रद्द का करावे?




जरी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर लगेच पॅनकार्ड रद्द करणे कायद्याने बंधनकारक नसले, तरी काही गोष्टी विचारात घेतल्यास ते करणे फायदेशीर ठरते:

- ✔ ओळख दुरुपयोग टाळण्यासाठी
- ✔ अकारण कर सूचना किंवा नोटिसा टाळण्यासाठी
- ✔ सरकारी नोंदी अप-टू-डेट ठेवण्यासाठी

**आवश्यक कागदपत्रे**

पॅनकार्ड रद्द करण्यासाठी मृत व्यक्तीचे पॅनकार्ड (असल्यास), मृत्यू प्रमाणपत्र (नगरपालिका किंवा रुग्णालयाने दिलेले), पॅनकार्ड रद्द करण्याची विनंतीपत्र (कायदेशीर वारसाने लिहिलेले), आपल्या पॅनकार्डची झेरॉक्स कॉपी, नाते दर्शविणारा पुरावा ( कायदेशीर वारसाचा दाखला, आधार कार्ड, वसीयतपत्र / उत्तराधिकारी प्रमाणपत्र) ही कागदपत्रे आवश्यक असतात.

**प्रक्रियेतील टप्पे**

- ✔ इनकम टॅक्स डिपार्टमेंटच्या असेसिंग ऑफिसरला पत्र लिहावे. यामध्ये मृत व्यक्तीचे पूर्ण नाव, पॅन क्रमांक, मृत्यूची तारीख, रद्द करण्याची विनंती व कारण, तुमचे नाव, पॅन, पत्ता व मृत व्यक्तीशी असलेले नाते नमूद करावे.
- ✔ यानंतर कायदेशीर वारसाने/प्रतिनिधीने पत्रावर स्वाक्षरी करावी.
- ✔ वर नमूद सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रत जोडावी.
- ✔ हे संपूर्ण पत्र आणि कागदपत्रे प्रत्यक्ष जाऊन अज कार्यालयात द्यावी किंवा नोंदणीकृत टपालाने संबंधित अज कार्यालयात पाठवावी.

**योग्य असेसिंग ऑफिसर कसा शोधावा?**

पॅनकार्ड रद्द करण्यासाठी योग्य अधिकाऱ्याला (एओ) पत्र पाठवणे गरजेचे आहे. यासाठी आयकर खात्याच्या संकेतस्थळाला भेट द्या. नो युवर एओ सुविधा निवडा. आता मृत व्यक्तीचा पॅनकार्ड क्रमांक टाका. यानंतर तुम्हाला त्या पॅनसाठी संबंधित अधिकाऱ्याचे नाव, पत्ता व इतर तपशील मिळतील.

**हेही लक्षात ठेवा**

- ✔ सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रत ठेवून द्या
- ✔ रजिस्टर पोस्ट केल्यास पोस्टाची पावती ठेवा
- ✔ २-३ आठवड्यांनी फॉलो-अप करा
- ✔ आवश्यकता असल्यास अज कार्यालयाला प्रत्यक्ष भेट द्या.

# अदानी ग्रुप ईशान्य भारतात करणार एक लाख कोटींची गुंतवणूक



भारताच्या ईशान्य भागाच्या आर्थिक विकासाच्या संधींना मोठ्या प्रमाणात चालना देत, अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी आसाम आणि संपूर्ण ईशान्य भारतासाठी येत्या दहा वर्षांत १ लाख कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली.

नवी दिल्लीत झालेल्या 'रायझिंग नॉर्थईस्ट ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिट'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, ईशान्य भारतातील राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आणि अनेक वरिष्ठ नेते व उद्योगपती यांच्या उपस्थितीत गौतम अदानी बोलत होते. त्यांनी सांगितले की, ही गुंतवणूक हरित ऊर्जा(ग्रीन एनर्जी), वीज वाहतूक (पॉवर ट्रान्समिशन), रस्ते, डिजिटल पायाभूत सुविधा, दळणवळण (लॉजिस्टिक्स) आणि स्किलिंग अँड व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर यांवर केंद्रित असेल. आपला भर स्मार्ट मीटर्स, जलविद्युत(हायड्रो), पंप स्टोरेज प्रकल्प, वीज वाहतूक, रस्ते व महामार्ग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, लॉजिस्टिक्स आणि स्किलिंग अँड व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून क्षमता वाढविण्यावर असेल, असे अदानी यांनी स्पष्ट केले.

फेब्रुवारी महिन्यात 'अ‍ॅडव्हान्टेज आसाम २.०' समिटमध्ये जाहीर केलेल्या ५०,००० कोटींच्या गुंतवणुकीला दुप्पट करत, त्यांनी आणखी ५०,००० कोटींच्या गुंतवणुकीची घोषणा केली.

केवळ भौतिक पायाभूत सुविधांच्या पलीकडे जात अदानी ग्रुपची गुंतवणूक रोजगार निर्मिती, स्थानिक उद्योजकता आणि समुदाय सहभाग यांना प्राधान्य देत आहे. अदानी यांनी सांगितले की, पायाभूत सुविधांपेक्षा अधिक आम्ही माणसांमध्ये गुंतवणूक करू. प्रत्येक उपक्रमात स्थानिक रोजगार, स्थानिक उद्योजकता आणि समुदाय सहभाग याला सर्वोच्च प्राधान्य असेल.

ताज्या घोषणेमुळे अदानी ग्रुप हा ईशान्य भारताच्या आर्थिक परिवर्तनामध्ये महत्त्वाचा खासगी भागीदार ठरणार असून ऊर्जा, संपर्क व्यवस्था(कनेक्टिव्हिटी) आणि येथील लोकांच्या उपजीविकेच्या संधींमध्ये दीर्घकालीन परिणामकारक बदल घडून येतील. ◆◆◆

# आयटीआर भरताना...

जर तुम्हाला प्राप्तीकर विभागाकडून कोणतीही नोटीस येऊ नये किंवा तुमचा परतावा अडकू नये असे वाटत असेल, तर ITR दाखल करण्यापूर्वी दोन महत्त्वाच्या गोष्टी तपासणे अत्यंत आवश्यक आहे. एक म्हणजे फॉर्म २६एएस आणि दुसरा म्हणजे वार्षिक माहिती विवरण (एआयएस अर्थात अ‍ॅन्युअल इन्फर्मेशन असेसमेंट)

फॉर्म २६एएस हे एक महत्त्वाचे टॅक्स क्रेडिट स्टेटमेंट आहे. या फॉर्ममध्ये तुमच्या पॅन कार्डवर किती करकापला गेला आहे आणि तो सरकारी खात्यात जमा झाला आहे, याची सविस्तर माहिती असते. यात तुमच्या पगारातून कापलेला टीडीएस, बँक व्याजावर कापलेला टीडीएस, मालमत्ता खरेदी-विक्रीवर कापलेला टीडीएस, म्युच्युअल फंड गुंतवणुकीवरील टीडीएस अशा अनेक नोंदी असतात.

हे तपासणे का आवश्यक? कारण, जर यामध्ये कोणतीही टीडीएस नोंद चुकली असेल किंवा ती योग्यरित्या दाखवली नसेल, तर तुम्हाला कर क्रेडिट मिळविण्यात अडचण येऊ शकते. याचा थेट परिणाम तुमच्या कर परताव्यावर होतो किंवा तुम्हाला जास्त कर भरावा लागू शकतो. त्यामुळे, रिटर्न भरण्यापूर्वी, यातील सर्व नोंदी तुमच्या माहितीनुसार आणि कागदपत्रांनुसार योग्य आहेत याची खात्री करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**वार्षिक माहिती विवरण (एआयएस) म्हणजे काय आणि ते का तपासावे?** : एआयएस हा फॉर्म २६एएस पेक्षाही अधिक तपशीलवार दस्तऐवज आहे. यात तुमच्या सर्व आर्थिक व्यवहारांची विस्तृत माहिती असते, जी प्राप्तीकर विभागाकडे उपलब्ध आहे. यामध्ये केवळ टीडीएसची माहिती नसते, तर बँकेकडून मिळालेले व्याज, लाभांश, शेअर्स आणि म्युच्युअल फंडांची खरेदी-विक्री, तुम्हाला मिळालेले भाडे, परदेशी व्यवहार आणि अगदी तुमच्या क्रेडिट कार्डवरील मोठे खर्च यांचीही माहिती नोंदवलेली असते. सोप्या भाषेत सांगायचे तर, एआयएस ही तुमच्या संपूर्ण आर्थिक प्रोफाइलची एक ब्लूप्रिंट आहे, जी तुमच्या प्रत्येक मोठ्या आर्थिक हालचालीची नोंद ठेवते.




**नोटीस टाळण्यासाठी हे तपासाच!**

जर तुम्ही तुमच्या खढठ मध्ये कोणतीही माहिती भरली नसेल, पण ती माहिती तुमच्या एआयएसमध्ये नोंदवलेली असेल, तर तुम्हाला प्राप्तीकर विभागाकडून नोटीस मिळण्याची शक्यता खूप वाढते. कारण, प्राप्तीकर विभागाकडे तुमच्या व्यवहारांची संपूर्ण माहिती असते आणि तुम्ही दिलेल्या माहितीशी ती जुळत नसेल, तर लगेच त्यांचा तुमच्याकडे संशय जातो. म्हणूनच, अखड तपासणे खूप महत्त्वाचे आहे आणि जर यात काही विसंगती आढळली तर तात्काळ इन्कम टॅक्स पोर्टलवर अभिप्राय द्या आणि ती दुरुस्त करून घ्या.

**आयटीआर कधीपर्यंत दाखल करता येईल?**

२०२५-२६ या कर निर्धारण वर्षासाठी ITR दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०२५ आहे (ज्या प्रकरणांमध्ये ऑडिट आवश्यक नाही). जरी आयटीआर भरण्याचे फॉर्म अजून पूर्णपणे अपडेट झालेले नसले, तरी तुम्ही फॉर्म २६एएस आणि एआयएस पाहून तुमची तयारी आताच सुरू करू शकता. ◆◆◆

# प्रशासन व वारकऱ्यांच्या समन्वयाने आषाढी वारी दिंड्यांचे उत्तम नियोजन

## वारकऱ्यांची चोख व्यवस्था ठेवण्याच्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रशासनाला सूचना

नगर – जिल्ह्यातील दिंडी सोहळ्याचे प्रमुख, वारकरी व प्रशासनातील अधिकारी – कर्मचाऱ्यांच्या एकमेकांमधील समन्वय व सहकार्याने पालखी सोहळ्याचे उत्तम नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी चोख व्यवस्था ठेवण्यात यावी, अशा सूचना त्यांनी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आषाढी वारी नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री.विखे पाटील बोलत होते. याप्रसंगी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, ह.भ.प.अशोक सावंत आदी उपस्थित होते.



आषाढी वारी नियोजन बैठकीत बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, आपल्या जिल्ह्यातून २६० दिंड्या करमाळा मार्गे सोलापूर जिल्ह्यात मार्गस्थ होतात. संत निवृत्तीनाथ पालखी मार्ग निर्हेण ते शेगुड पर्यंत रस्त्यांचे खड्डे बुजविण्यात यावे. साईड पट्ट्या दुरूस्त कराव्यात. दिंडी मार्गावरील पारेगाव येथे मुलभूत सुविधा पुरवाव्यात. संपूर्ण पालखी मार्गावर रूग्णवाहिका तयार ठेवण्यात यावेत. दिंड्याच्या नोंदणीसाठी प्रत्येक तहसील कार्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावे.

यावर्षी पालखीच्या सुरूवातीलाच पाऊस होत आहे, त्यामुळे वारकऱ्यांची सुरक्षा म्हणून यापुढे पावसाचे अंदाज वर्तविणारी अद्यावत यंत्रणा उभारण्यात येणार आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या २६० दिंड्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी – कर्मचाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक दिंडीत पुरेसे औषधे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिली.

श्री.विखे पाटील म्हणाले, ज्या गावात अथवा शहरामध्ये या दिंड्या मुक्कामी थांबणार आहेत त्या ठिकाणच्या शाळा, महाविद्यालय, मंगल कार्यालयामध्ये वारकऱ्यांची मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार असून त्याठिकाणी शुद्ध पिण्याचे, पाणी, अखंडितपणे वीज, आरोग्य व शौचालयाची व्यवस्थाही केली जाणार आहे. मागील वर्षीच्या दिंडीतील वारकऱ्यांच्या अडचणी यावर्षी दूर केल्या जातील. वारकऱ्यांच्या सूचनांची दखल घेतली जाईल.

वारकरी पायी चालत असलेल्या मार्गावर वाहतुकीचे नियमन करण्याबरोबरच वारकऱ्यांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी दिंड्यासोबत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. दिंड्या ज्याठिकाणी मुक्कामी राहतील तेथेही पोलीस कर्मचारी उपस्थित राहतील दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पालखीमार्गावर आवश्यक साधनांसह तात्पुरते आरोग्य केंद्र उभारण्यात यावे, श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानेश्वर देवस्थानाचा ७०० कोटींचा विकास आराखडा तयार केला जाणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षी प्रत्येक दिंडीला २० हजार रूपये अनुदान व प्रत्येक वारकऱ्यास पाच लाख रूपयांचा विमा देण्यास शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

अनेकवेळा मुक्कामाच्या ठिकाणी अशुद्ध पाणी पिल्याने अनेक वारकरी आजारी पडतात. त्यामुळे प्रत्येक दिंड्यातील वारकऱ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. ज्या दिंड्याकडे स्वतःचे पाणी टँकर आहेत, त्यांच्या टँकरमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी भरून देण्याची व्यवस्था करण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

दिंडीमध्ये अस्वच्छता होऊ नये यासाठी 'हरित वारी – निर्मल वारी' उपक्रम राबविण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आमदार शिवाजीराव कर्डीले, आ.विठ्ठलराव लंघे, आ.अमोल खताळ यांनीही वारीच्या नियोजनाच्या दृष्टीने सूचना केल्या.

या बैठकीला जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील ७६ दिंडीचे प्रमुख तसेच वारकरी प्रतिनिधी उपस्थित होते.



तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत शिरोमणी संताजी महाराज शैक्षणिक योजने अंतर्गत समाजातील इ.१ ली ते इ. १२ वी तील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे मोफत वह्या वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी ट्रस्टचा नेहमीच पुढाकार

## निता लोखंडे यांचे प्रतिपादन; तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

नगर – शिक्षणातून मुला–मुलींचे भविष्य घडत असते. हे शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मुलांना शिक्षण घेतांना अडचणी येऊ नये यासाठी तिळवण तेली समाज ट्रस्टने नेहमीच मदतीचा हात दिला आहे. उच्च शिक्षणासाठी ट्रस्ट सहाय्य करत असते. यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना ट्रस्टच्यावतीने वह्याचे वाटप करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनीही चांगला अभ्यास करुन आपल्या कुटूंबाचे व समाजाचे नाव उज्वल करावे. मुलांचे उज्वल भविष्यासाठी ट्रस्टचा नेहमीच पुढाकार राहिला आहे, असे प्रतिपादन तिळवण तेली समाज ट्रस्टच्या अध्यक्षा सौ.निता लोखंडे यांनी केले.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत शिरोमणी संताजी महाराज शैक्षणिक योजने अंतर्गत समाजातील इ.१ ली ते इ. १२ वी तील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे मोफत वह्या वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक विजयराव दळवी, कानिफनाथ शेंदूरकर, लक्ष्मणराव डोळसे, ट्रस्टच्या अध्यक्षा सौ.निता लोखंडे, सचिव शशिकांत देवकर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, दत्तात्रय डोळसे, शोभना धारक, प्रकाश सैंदर, सागर काळे, गोकूळ कोटकर आदि उपस्थित होते.

याप्रसंगी प्रसाद शिंदे म्हणाले, तिळवण तेली ट्रस्टच्यावतीने दरवर्षी इ.१ ली ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत असते. यंदाही विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा शुभारंभ नुकताच झाला असून, ३० मे पर्यंत हा उपक्रम सुरु राहणार आहे. विद्यार्थांनी गुणपत्रक, आधार कार्डची झेरॉक्स जमा करुन आपल्या वह्या दाळमंडई येथील ट्रस्टच्या कार्यायातून दु.३ ते ५ या वेळेत घेऊन जाव्यात, असे आवाहन केले.

विजयराव दळवी म्हणाले की, तिळवण तेली समाजाच्यावतीने वर्षभर विविध समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यांचे काम अतिशय उत्कृष्ठ असे असून आम्ही ज्येष्ठ म्हणून त्यांना सदैव मार्गदर्शन करत असतो, असे ते म्हणाले.

सूत्रसंचालन मनोज क्षिरसागर यांनी केले. शशिकांत देवकर यांनी आभार मानले. ट्रस्टच्यावतीने आजपर्यंत उत्तम दर्जाच्या वह्यांचे वाटप केले असून, यंदाही मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात येणार असल्याचे ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – नातेवाईकाच्या लग्नाला आईसोबत आलेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील मठपिंप्री येथे २३ मे रोजी दुपारी ३ ते ४ वाजण्याच्या दरम्यान घडली.

या बाबत अपहृत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी या त्यांच्या मुलींसह मठपिंप्री गावामध्ये नातेवाईकाच्या लग्नास गेल्या असता त्यादरम्यान मुलीस कोणीतरी अनोळखी इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून, पळवुन नेले आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये पार्किंगमध्ये गाडी लावण्याच्या कारणावरुन चौघा जणांकडून बेदम मारहाण

नगर – पार्किंग मध्ये चार चाकी टेम्पो लावण्याच्या कारणावरुन वॉचमनने व इतरांनी शिवीगाळ दमदाटी करीत लाथा बुक्क्यानी, लोखंडी फायटरने, व लाकडी बॅटने मारहाण केली. ही घटना सावेडी येथील हनुमंत रेसिडेन्सी येथे २४ मे रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत शकील नवाब शेख (रा. हनुमंत रेसिडेन्सी, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा डोळ्याचे गॉगल विकण्याचा व्यवसाय असून व्यवसाया करीता वापरत असलेला चार चाकी टेम्पो नेहमी अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये लावतात. २४ मे रोजी रात्री फिर्यादी हे नेहमीप्रमाणे पार्किंगमध्ये टेम्पो लावीत असताना तेथील वॉचमन शिंदे (पूर्ण नाव माहित नाही) व डॉ. प्रदीप भोसले हे तेथे होते. त्यावेळी वॉचमन शिंदे यांनी या ठिकाणी गाडी लावू नकोस असे म्हटल्याने मी येथे दररोज गाडी लावतो तू कशामुळे गाडी लावू नको असे सांगतो असे फिर्यादीने म्हटले. त्यावेळी वॉचमन शिंदे याने शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यानी मारहाण केली. शिंदे याच्या सांगण्यावरुन प्रदीप भोसले यांनीही शेख यांना मारहाण केली. यावेळी शेख यांनी कसेबसे यांच्या तावडीतून सुटका करून घेतली त्यानंतर शेख हे कुटुंबासह पार्किंग मधून जात असताना वॉचमन शिंदे याची पत्नी जया, मुलगा रोहित व प्रदीप भोसले यांनी शेख यांना शिवीगाळ करुन लोखंडी फायटर व लाकडी बॅटने बेदम मारहाण केली. जया शिंदे यांनी शेख यांच्या पत्नीस लाथाबुक्क्यानी मारहाण केली. या मारहाणीत शेख हे जखमी झाले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात शकील शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघाविरुद्ध बी एन एस कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे मारहाणीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहे.

# दरेवाडी परिसरातून २ सख्ख्या बहिणी झाल्या बेपत्ता

नगर – नगर–सोलापूर रोडवरील दरेवाडी परिसरातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी आणि २१ वर्षीय तरुणी अशा दोघी सख्ख्या बहिणी बेपत्ता झाल्या आहेत. त्यांना अज्ञात आरोपींनी कशाचेतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत त्यांच्या आईने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

ही घटना २३ मे रोजी दुपारी १२ ते रात्री ८ वाजेच्या दरम्यान घडली आहे. दोघी बहिणी घरी होत्या तर त्यांचे कुटुंबीय बाहेर गेलेले होते. रात्री कुटुंबीय घरी आले तेव्हा त्यांना मुली घरात आढळून आल्या नाहीत. त्यांचा दरेवाडी परिसर, नातेवाईक व मुलीच्या मैत्रिणीकडे चौकशी करुन शोध घेतला असता त्या कोठेही मिळून आल्या नाहीत. त्यामुळे त्यांना कोणीतरी कशाचेतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत त्यांच्या आईने २५ मे रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींच्या विरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा

## दीक्षा घाटविसावे यांचे प्रतिपादन; प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

नगर – रुग्णसेवेमध्ये परिचारिकांचे स्थान अद्वितीय असून निस्वार्थ भावनेने समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य दीक्षा घाटविसावे यांनी केले.




प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सावेडी, येथील प्रयत्न नर्सिंग कॉलेजमध्ये नुकताच जागतिक परिचर्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वैश्विक आरोग्यासाठी परिचारिकांनी प्रार्थना केली व अविरत परिचर्या सेवेसाठी शपथ घेऊन दीप प्रज्वलन केले. याप्रसंगी प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे यशस्वीरित्या नर्सिंग शिक्षण पूर्ण करून ज्या विद्यार्थ्यांना बाहेरील देशांमध्ये, आर्मी हॉस्पिटलमध्ये त्याचबरोबर डी.एम.ई.आर., डी.एच.एस. मध्ये गव्हर्मेंट नोकरी लगेचच उपलब्ध होऊन कामाची सुवर्णसंधी मिळाली आहे व ज्या विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्यू द्वारे एन. ए. बी. एच. ॲक्रेडेबल मल्टीस्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सिलेक्शन झालेल्या, अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील आयुष्याच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी, परिचारिका समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कशाप्रकारे कार्य करून आपली महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात याचे नाट्य स्वरूपात सादरीकरण केले, तसेच परिचारिका सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांनी गीत व नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. परिचारिका दिनानिमित्त कॉलेजच्यावतीने पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मॉडेल्स मेकिंग स्पर्धा, लोगो स्पर्धा, प्रश्नमंजुषा असे वेगवेगळे उपक्रम आयोजित केले गेले व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कॉलेजच्या मुख्याध्यापिका दिक्षा घाटविसावे व शिक्षिका स्मिता तडके, शिक्षक अविष्कार बिडवे यांना उपदेशक व बुथ हॉस्पिटल अहमदनगर यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय परिचारिका गौरव पुरस्कार सोहळ्यामध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याबद्दल प्रयत्न नर्सिंग कॉलेजचे अध्यक्ष डॉ. विक्रम म्हस्के व संचालिका डॉ. शितल म्हस्के व इतर सर्व विश्वस्तांनी कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

### ट्रकमधून डिझेलची चोरी

नगर – केडगाव बायपासजवळील शनिकृपा टायर्सच्या पार्किंगमध्ये उभी असलेल्या ट्रक (डीएन ०९, एस ९९९६) मधून अज्ञात चोरट्याने २८ हजार ५०० रूपये किमतीचे ३०० लिटर डिझेल चोरून नेल्याची घटना २४ मे रोजी पहाटे तीन ते साडेतीनच्या सुमारास घडली असून या प्रकरणी सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल नवनीत सुरपुरीया (वय ३१, रा. आनंदऋषी हॉस्पीटलसमोर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी विशाल सुरपुरीया यांच्या मालकीचे केडगाव बायपासजवळ शनिकृपा टायर्सचे दुकान आहे. या दुकानाच्या पार्किंगमध्ये ट्रक उभा होता. त्या ट्रकच्या डिझेल टाकीचे झाकण तोडून अंदाजे ३०० लिटर डिझेल अज्ञात चोरट्याने चोरून नेले. शनिवारी पहाटे ही घटना घडली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मंगलदीप मल्टीस्टेट संस्थेस दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी १ महिन्याची कैद व पन्नास हजार रुपये दंड देण्याचा आदेश

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. ७. आय. एम. नाईकवाडी यांनी आरोपी दुर्गा श्रीराम सोनार यांना १ महिन्यांचा सश्रम कारावास व रक्कम रु. पन्नास हजार रुपये दंड देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. आरोपी दुर्गा श्रीराम सोनार यांनी फिर्यादी सोसायटी मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रे.सोसायटी ली. एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर यांचे कडून कर्ज घेतले होते, त्याचे परताव्या पोटी त्यांनी सोसायटीस धनादेश दिलेला होता. सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी सोसायटीने त्यांचे विरुद्ध न्यायालात प्रकरण दाखल केले होते, त्या प्रकरणामध्ये कोर्टाने आलेल्या पुराव्याचा विचार करून आरोपींना एक महिन्याचा साधा कारावास व रक्कम रु. पन्नास हजार रुपये दंड व दंड रक्कम न भरल्यास चार दिवसांचा साधा कारावास अशी शिक्षा देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी सोसायटीचे वतीने ॲड. अमित विजय राशिनकर यांनी काम पहिले व त्यांना ॲड. मिलिंद घोरपडे यांनी सहकार्य केले. तसेच फिर्यादी सोसायटीचे वतीने माहीतगार इसम म्हणुन सागर फूलारी यांनी साक्ष दिली.



हरियाना येथे झालेल्या १७ वर्षाखालील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील, शिऊर गावचा आंतरराष्ट्रीय पैलवान सुजय तनपुरे याला सुवर्णपदक देताना स्पर्धा संयोजक.

# राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सुजय तनपुरेला सुवर्णपदक

नगर – हरियाना येथे रविवारी झालेल्या १७ वर्षाखालील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील, शिऊर गावचा आंतरराष्ट्रीय पैलवान सुजय तनपुरे याने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पकवले आहे. त्याच्या या यशाबद्दल अहिल्यानगर राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष व जिल्हा कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

पै. सुजय तनपुरे ने २०२३ सालीही १५ वर्षाखालील कुस्ती स्पर्धेत भारताला सुवर्णपदक जिंकून दिले होते. त्याने आजपर्यंत महाराष्ट्राला आणि देशाला अनेक पदके जिंकून दिली आहेत. अशा यशस्वी व उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकल्याचा अभिमान नगरच्या कुस्ती क्षेत्राला आहे, असे जिल्हा कुस्तीगीर संघांचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके यांनी देखील आंतरराष्ट्रीय पैलवान सुजय तनपुरे याचे कौतुक करत भविष्यात देखील अशीच नेत्रदीपक कामगिरी करेल अशी खात्री व्यक्त करत आगामी आशियाई स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# ध्येयावर लक्ष केंद्रित करा : श्रेणिक शिंगवी

नगर – सर्वात आधी शिक्षण पूर्ण करा. मुलींनी स्वतःच्या पायांवर उभे राहणं ही आजच्या काळाची गरज आहे. संस्कार, नितीमूल्य जपा. स्वतःची आवड, छंद जोपासा. आवडीच्या क्षेत्रात काम केलं की आपल्याला अधिक ऊर्जा मिळते. सलग २५ व्या वर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करणे हे सेवाभावी संस्थेचे सातत्य निश्चितच अनुकरणीय आहे, आनंद देणारी कृती आहे. चांगले, वाईट अनुभव घ्या पण कुठेही स्वतःला न गुंतवता ध्येयावर लक्ष केंद्रित करा असे प्रतिपादन नाट्य, मालिका, चित्रपट अभिनेते श्रेणिक शिंगवी यांनी केले.



सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्थेच्या वतीने १० वी व १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्थेच्या वतीने समाजसेवा हिच खरी ईश्वरसेवा हे ब्रीद घेऊन दरवर्षी इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम करण्यात येतो. यंदाच्या २५ व्या वर्षी २५ मे रोजी सायं. ५ वा. माळीगल्ली, भिंगार येथील श्री संत शिरोमणी सावता माळी मंदिरात झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शिंगवी बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून प्राध्यापिका सीमा मेहेर म्हणाल्या की, सध्याचा काळ हा स्पर्धेचा काळ आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता ओळखून 'व्हॉट कॅन आय डू...' हे स्वतःला विचारा. आजचे पालक सुज्ञ आहेत. आत्मविश्वासाने स्वतःचे स्वप्न पूर्ण करा. स्वप्न तेच असतं जे आपल्याला झोपू देत नाही. योग्य निर्णय घेऊन निवडलेल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करा. मुलांनी मोबाईल, गाडीचा हट्ट न धरता जे मिळवलं त्याचा योग्य वापर करा.

पालकांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना स्नेहल लवांडे म्हणाल्या की, गुणवत्ता ही जबाबदारी आहे. आमच्या विद्यार्थ्यांचा सन्मान केल्यामुळे शिक्षकांनाही आनंद होतो. सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्थेने गेले २४ वर्षे सामाजिक कार्य केले आहे.

नितीन पुंड म्हणाले की, मोठ्या मुलाला नव्वद टक्के गुण मिळाले, धाकट्या मुलाला ऐंशी टक्के गुण मिळाले हा भेदभाव न करता, त्यांचा आनंदाने स्वीकार करा. पाल्याच्या पाठीशी ठामपणे उभे रहा. आपल्या पाल्याला चांगला नागरिक होण्यासाठी घडवा.

रंगकर्मी अविनाश कराळे म्हणाले, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणारी सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्था आहे. पाल्यामधील गुण ओळखलेच पाहिजेत. जिद्द, चिकाटीने योग्य मार्गावर चालुन यशस्वी व्हा.

त्र्याऐंशी वेळा रक्तदान करणारा रक्तदाता श्रीकांत वराडेंचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी श्रेणिक शिंगवी, प्राध्यापिका सीमा मेहेर, नितीन पुंड, अविनाश कराळे, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पांढरे, श्रीकांत वराडे, सौ. ज्योती राऊत, सौ. अपर्णा पांढरे ह्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान तसेच गरजु विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लखन टेके, राजेश नागपुरे, अभय पांढरे, सुजीत गोटे, नीलेश रासकर यांच्या सह सेवाभावी संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन साहित्यिक, व्याख्याते, अभिनेते सुनील राऊत यांनी केले. राजेंद्र पांढरे यांनी आभार मानले.

